RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी
बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक १९ | सोमवार दि.१९ मे २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -19 | MONDAY DT.19 MAY 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES



## डोमेगांव गावात अन् फाट्यावर खुलेआम अवैध देशी विदेशी दारू विक्री सुरु

प्रतिनिधी @ अंबड

अंबड पोलीस ठाण्याच्या अंतर्गत येत असलेल्या डोमेगांव गावात अन् फाट्यावर अवैध देशी विदेशी दारू चा व्यवसाय कित्येक दिवसांपासून सुरू आहे.मात्र याकडे पोलीसांचे लक्ष नसल्याने आणि त्यात पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने आता दारु विक्रता मुजोर झाला असून विनापरवाना दिवसाढवळ्या डोमेगांव गावात अन् फाट्यावर खुलेआम अवैध देशी विदेशी दारू विक्री करत आहे या दारुच्या नादी लागून तरुण पिढी दारुच्या आहारी जात असल्याने याकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष लक्ष देणार का ? असा गावकऱ्यांकडून होत आहे.

# शिवराज दिवटे प्रकरणातील आरोपींची धिंड काढा, त्यांच्यावर मकोका लावा-आ.धस

प्रतिनिधी । बीड

बीडमधील परळी येथे शुक्रवारी संध्याकाळच्या सुमारास शिवराज दिवटे या तरुणाला समाधान मुंडे आणि त्याच्या दहा ते पंधरा जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केली. या टोळक्याने त्याचे अपहरण करून त्याला डोंगराळ भागात नेले आणि बांबू व लाकडी दांडक्यांनी अमानुष मारहाण केली. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात खळबळ उडाली. मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या शिवराज दिवटे याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणी परळी पोलिसांनी आतापर्यंत सात आरोपींना अटक केली आहे. तर या प्रकरणात काही अल्पवयीन मुलांचा देखील समावेश आहे. आता यावरून भाजप आमदार सुरेश धस यांनी शिवराज दिवटे प्रकरणातील आरोपींवर मकोका लावा, अल्पवयीन मुलांवर पोरशे कार प्रकरणाचा धागा पकडून कारवाई करा, अशी मागणी केली आहे.

सुरेश धस म्हणाले की, शिवराज दिवटे याला झालेल्या मारहाणीची घटना अमानवी आहे. पोलीस दलाने जे चुकीचे वागतील त्यांची जनतेतून धिंड काढावी. त्याशिवाय हे लोक वठणीवर येणार नाहीत. सरपंच देशमुख यांना ज्या पद्धतीने मारले आहे, तीच सगळी भाषा शिवराज दिवटे प्रकरणात आहे, असे त्यांनी म्हटले.

अंबाजोगाई रुग्णालयातील डॉक्टरांचे गुन्हेगारांना अभय

सुरेश धस पुढे म्हणाले की, अंबाजोगाई येथील शासकीय रुग्णालयातील काही डॉक्टर एकाच ठिकाणी पंधरा वर्षांपासून आहे. हेच डॉक्टर पाय मोडला तरी खरचटले म्हणून अहवाल देतात. त्यामुळे हे डॉक्टर मकोकामध्ये आरोपी झाले पाहिजे, याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणार आहे. अंबाजोगाई रुग्णालयातील डॉक्टर गुन्हेगारांना अभय देते. महादेव मुंडे यांच्या प्रकरणात देखील हेच लोक आहेत, असे आरोप त्यांनी यावेळी केलाय.

पुण्यातील पोरशे कार प्रकरणातील धागा पकडून कारवाई व्हावी

शिवराज दिवटे प्रकरणात आरोपींवर मकोका लावला जावा. तर उर्वरित दोन अल्पवयीन मुलांवर पुण्यातील पोरशे कार प्रकरणातील धागा पकडून त्यांच्यावर कारवाई व्हावी. ज्या ठिकाणी या आरोपींनी गुन्हा केला, त्या ठिकाणी आरोपींना हातकडी घालून रस्त्यावर फिरवावे, जेणेकरुन इतर आरोपींच्या मनात भीती निर्माण होईल. यातील आरोपींचे फोटो आकासोबत बाहेर पडले आहेत. त्यामुळे हे लोक कुणाचे आहेत? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला.



### दुश्मन का दुश्मन हमारा दोस्त

भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर आपल्याला युद्धाची गरज नाही, बलुचिस्तानला पाठींबा देऊ, असे वक्तव्य सुरेश धस यांनी केले होते. याबाबत विचारले असता दुश्मन का दुश्मन हमारा दोस्त, ७४ वर्षांपासून बलुचिस्तानचा लढा सुरू आहे. पाकिस्तानातील ४४ टक्के भाग बलुचिस्तानचा आहे आणि त्याच बलुचिस्तानकडून पाकिस्तान आम्हाला नको, अशी मागणी आहे. त्यांचे स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केंद्र सरकार मदत करणार, असे त्यांनी म्हटले.

### पोलिसांनी आरोपींची धिंड काढावी

उद्या उपमुख्यमंत्री अजित पवार येथे येत आहेत. त्यांनी बैठकीपूर्वी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत बोलावं. हे सत्र बंद व्हायला तयार नाही, पोलिसांनी आरोपींची धिंड काढावी. त्याशिवाय हे थांबणार नाही. ज्यांच्यावर गंभीर गुन्हे आहेत, त्यांच्यावर मकोका लावावा, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

## पिंपळनेर,पेंडगाव, मांजरसुंभा याठिकाणी शिवसंग्राम सदस्य नोंदणी अभियानास सुरावात

### सदस्य नोंदणीस प्रचंड प्रतिसाद




प्रतिनिधी @ बीड

शिवसंग्राम सभासद नोंदणी अभियानाच्या पार्श्वभूमीवर अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या सुचनेनुसार बीड जिल्ह्यात १ मे पासून सुरू असलेल्या सभासद नोंदणी अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दी. १४ मे आणि १७ मे रोजी पिंपळनेर, बहीरवाडी सर्कल आणि नेकनुर सर्कल येथील पिंपळनेर,पेंडगाव, मांजरसुंभा येथे सदस्य नोंदणी अभियान राबवण्यात आले यात तिन्ही ठिकाणी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत शिवसंग्राम चे प्राथमिक सदस्य होता आहेत. यात पेंडगाव आणि मांजरसुंभा येथील सदस्य नोंदणी अभियानास डॉ. ज्योती मेटे यांनी हजेरी लावत सदस्य नोंदणीचा उत्साह वाढवला.

उपस्थित पदाधिकाऱ्यांना सभासद नोंदणी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले तसेच मोठ्या उत्साहात अभियानाचे संपूर्ण नियोजन करून सदस्य नोंदणी अभियानाला शुभारंभ करण्यात आला. समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांचा सदस्यता नोंदणीला मोठा प्रतिसाद मिळत आहे. आगामी काही दिवसात पन्नास हजार प्राथमिक सदस्य आणि दहा हजार सक्रिय सदस्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. शिवसंग्रामचे संस्थापक लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती पर्यंत हे उद्दिष्ट पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी शिवसंग्राम चे पदाधिकारी, कार्यकर्ते जिल्हा ,तालुका, सर्कल आणि गावोगावी काम करत आहेत. असे प्रतिपादन याप्रसंगी डॉ. ज्योती मेटे यांनी केले.

यावेळी यावेळी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे, शहराध्यक्ष सुहास पाटील,उपाध्यक्ष सचिन कोटुळे, तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने, पंचायत समिती मा. सभापती ज्ञानेश्वर कोकाटे,संचालक सचिन काळकुटे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे, धर्मराज मागदे सर, सुनील शिंदे, राजेंद्र आमटे ,

(उर्वरीत पान २ वर)

# अजितदादा पवार यांच्या सभेला बहुसंख्येने उपस्थित रहावे - आ. विजयसिंह पंडित

### विकास कामांसह अतिक्रमणधारकांना पीटीआर वाटपाचा शुभारंभ होणार

प्रतिनिधी @ गेवराई

विधानसभा निवडणुकीनंतर गेवराई शहरात १८ कोटी रुपयांचा निधी मंजुर झाला, अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेला हक्काच्या पीटीआर चा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघाला. उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वामुळे हे शक्य झाले. त्यांच्या शुभहस्ते विकास कामांसह अतिक्रमण धारकांना पीटीआर वाटपाचा शुभारंभ सोमवार दि. १९ मे रोजी सायं. ५.३० वा. गेवराई शहरात होणार आहे. या निमित्ताने आयोजित केलेल्या सभेला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. गेवराई येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांच्यासह त्यांच्या सहकार्यांच्या पक्ष प्रवेशाची घोषणा केली.



गेवराई शहरातील १८ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांसह अतिक्रमणधारकांच्या हक्काच्या पीटीआर वाटपाचा शुभारंभ सोमवार दि. १९ मे सायंकाळी ५.३० वा. र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई च्या प्रांगणावर होणार आहे. या प्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हयाचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार, राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजीमंत्री आ. धनंजय मुंडे, जयभवानी सह. सा. कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, आ. सतिष चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आमदार बाळासाहेब आजबे, राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुनिल मगरे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख स्वप्निल गलधर यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत. या निमित्ताने आयोजित केलेल्या सभेला बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. या बाबत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पत्रकार परिषदेला आ. विजयसिंह पंडित यांच्या सह महेश दाभाडे, बीडचे माजी नगरसेवक निजाम शेख, सचिन मोटे, कृष्णा मुळे , मंजुर बागवान, विलास सुतार, राधेशाम येवले, किशोर कांडेकर यांच्यासह मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते.


यावेळी बोलतांना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विधानसभा

(उर्वरीत पान २ वर)

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी डीएपी खताला पर्यायी खतेच वापरावी

प्रतिनिधी @ बीड

शेतकऱ्यांकडून पेरणीला सुरुवात होणार असून डीएपी खताची शेतकऱ्यांकडून जास्त मागणी आहे. डीएपी खतामध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. डीएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी शेतकऱ्यांनी पर्यायी खते वापरावे, असे आवाहन करण्यात आले आहे.स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशांतर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्केसह सल्फर व इतर सूक्ष्म



संयुक्त खतं ठरतात पोषक

एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके १०:२६:२६, एनपीके २०:२०:०:१३, एनपीके १२:३२:१६ व एनपीके १५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# धनंजय मुंडेंनी घेतली शिवराज दिवटेची भेट

### दिवटे कुटुंब माझ्या घरातले, शिवराजच्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी – धनंजय मुंडे



प्रतिनिधी @ अंबाजोगाई

दोन दिवसांपूर्वी परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे यांच्याकडून माहिती घेतली.

शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, सुरज ला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा कॉ चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते.

## पालकमंत्री अजित दादा बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्या देखील सुरक्षित नाहीत ?

### पोलीस स्टेशनला तक्रार देवूनही गुन्हा दाखल होत नाही, का ?

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील नामांकित असलेल्या एका सोशल महिला वर्कर्सला अश्लील मेसेज, कॉल्स करून एक जबाबदार व्यक्ती सातत्याने हैराण करतो.त्याच्या त्या वागणुकीला वैतागून जीवन असह्य झालेल्या त्या सामाजिक कार्यकर्तीने अखेर पोलीस स्टेशन गाठून लेखी तक्रार संबंधित व्यक्तीच्या विरोधात दिली. मात्र संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रमुखांनी सदरील व्यक्तीला केवळ कॉल करून सोडून दिले, कशामुळे ? पालकमंत्री अजित दादा बीड जिल्ह्यातील वाढती गुंडगिरी आणि सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांची असुरक्षितता या संदर्भात आपण आज प्रशासनाशी आढावा घेऊन किमान या प्रकरणात तरी न्याय द्यावा अशी अपेक्षा आहे.

बीड जिल्ह्यातील वंचित,उपेक्षित, गोरगरीब,

(उर्वरीत पान २ वर)



शिव वाणी
SHIV VANI



# संपादकीय

## राष्ट्रपतींचे प्रश्नोपनिषद

तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी विरुद्ध राज्य सरकार यांच्या खटल्यात न्यायालयाचा निर्णय आणि राष्ट्रपती-राज्यपालांना विधेयकमान्यतेसाठी एक ते तीन महिन्यांची मुदत, यानंतर हा संघर्ष सुरू झाला आहे.

विधेयकांना मान्यता देण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना मुदत घालून देणाऱ्या निवाड्याच्या अनुषंगाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वोच्च न्यायालयास विचारलेल्या १४ प्रश्नांमधून लोकशाहीच्या दोन स्तंभांमध्ये पुन्हा संघर्ष उभा राहणार काय, असा प्रश्न उपस्थित होतो. नवे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी पदाची शपथ घेताच राष्ट्रपतींनी पाठविलेल्या प्रश्नांमधून न्यायसंस्थेपुढे उभ्या राहू पाहणाऱ्या आव्हानाला त्यांना तोंड द्यावे लागणार, असे दिसते. तमिळनाडूचे राज्यपाल आर. एन. रवी विरुद्ध राज्य सरकार यांच्या खटल्यात न्यायालयाचा निर्णय आणि राष्ट्रपती-राज्यपालांना विधेयकमान्यतेसाठी एक ते तीन महिन्यांची मुदत, यानंतर हा संघर्ष सुरू झाला आहे.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी याच संदर्भात सर्वोच्च न्यायालयावर केलेली टीका आणि 'संसद नव्हे, संविधानच श्रेष्ठ,' हे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्टीकरण, ही पार्श्वभूमी याला आहे. 'विधेयक मंजूर झाल्यावर राज्यपालांपुढे कोणते घटनात्मक पर्याय आहेत', 'राज्यपालांनी निर्णय घेताना मंत्रिमंडळाचा सल्ला स्वीकारणे बंधनकारक आहे का', 'राष्ट्रपती-राज्यपाल यांच्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देता येते का', 'घटनेतील कलम ३६१ हे राज्यपालांच्या निर्णयाचा आढावा घेण्यास प्रतिबंध करू शकते का', तसेच विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी घटनेत राज्यपालांना कालमर्यादा नसेल, तर न्यायालय ती ठरवू शकते का', 'घटनेतील कलम १४२नुसार राष्ट्रपती किंवा राज्यपालांचे आदेश बदलता येतात का' आणि 'कलम २००नुसार राज्यपालांच्या मान्यतेशिवाय राज्य सरकार कायदे करू शकते का,' अशा १४ प्रश्नांचा त्यात समावेश आहे.

तमिळनाडू प्रकरणी निवाडा आल्यानंतर काही अभ्यासकांकडून आणि सत्ताधारी गोटातूनही न्यायालयीन सक्रियतेचा मुद्दा उपस्थित करण्यात आला; तसेच राष्ट्रपती-राज्यपालांच्या विशेषाधिकारांवर गदा येत असल्याची आणि सर्वोच्च न्यायालय घटनेचा 'अन्वयार्थ' लावण्याऐवजी अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन 'दुरुस्ती' करीत असल्याचीही टीका झाली. राष्ट्रपतींच्या प्रश्नावलीमध्ये याच आक्षेपांचे प्रतिबिंब दिसते. यांपैकी काही प्रश्नांबाबत घटनेत नेमक्या तरतुदी आहेत. प्रामुख्याने तमिळनाडूचा निकाल दोन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने दिला असताना, 'अशा घटनात्मक विषयांवर किमान पाच सदस्यांच्या खंडपीठाने निकाल देणे अपेक्षित आहे,' हा आक्षेप प्रश्नावलीतून दिसतो; तसेच राज्यपालांच्या मान्यतेशिवाय सरकारला कायदे करता येत नाहीत, हेही स्पष्टपणे नमूद आहे. मात्र, घटनेतील कलम १४२नुसार मुख्यत: राष्ट्रपती-राज्यपालांना विधेयकांना मान्यतेस अनिश्चित काळासाठी विलंब करण्याच्या अधिकारांचा कायदेशीर आढावा घेण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयास आहेत का, हा प्रश्न साऱ्याच्या मुळाशी दिसतो. मूलभूत अधिकार, कायद्याचे राज्य आणि लोकशाही तत्त्वांचे संरक्षण या उद्देशांनी कलम १४२चा वापर होतो. त्यानुसार एखाद्या विषयाबाबत कायद्यात अस्पष्टता असेल,

## टि शी हरवला आहे

**धारूर तेलगाव प्रवासात विकास असांबर तोंडे रा सोनिमोहा ता धारूर जी बीड यांचा इयत्ता दहावीचा टी शी मार्कमेमो हरवला आहे .सापडल्यास खलील पत्त्यावर संपर्क करा**

**मो ८७८८५४३६३६**

# एल्गार मेळाव्यातून राज्यव्यापी कर्जमुक्ती आंदोलनाची मशाल पेटली

## कर्जमुक्ती द्या, अन्यथा मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही – रविकांत तुपकर

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**

विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचे खोटे आश्वासन देणाऱ्या राज्यातील महायुती सरकार विरोधात क्रांतीकारी शेतकरी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन छेडले जाणार आहे. याच अनुषंगाने राज्यात विविध जिल्ह्यात कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. शनिवार, दि.१७ मे रोजी अंबाजोगाई तालुक्यातील मांजरा बेल्ट पट्ट्यातील देवळा येथे आयोजित कर्जमुक्ती एल्गार मेळाव्यात क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी राज्य सरकार विरोधात शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती मिळविण्यासाठी मशाल पेटवून राज्यव्यापी आंदोलनाचे रणशिंग फुंकले. सरकारने शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात दुर्लक्ष केले तर जून महिन्यामध्ये राज्यभरात आक्रमक आंदोलन छेडले जाईल, राज्यातील कुठल्याही मंत्र्याला रस्त्यावर फिरू दिले जाणार नाही, आता शेतकरी स्वस्थ बसणार नाहीत. राज्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या सरकारने याची वेळीच दखल घ्यावी अन्यथा मुंबई येथे मंत्र्यांना मंत्रालयातील त्यांच्या दालनातच घेराव घालू, कुठल्याही परिस्थितीत राज्यातील शेतकरी कर्जमुक्त होईपर्यंत आंदोलन सुरूच ठेवणार असल्याच्या निर्धार रविकांत तुपकर यांनी यावेळी व्यक्त केला.

कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याच्या विचारमंचावर संयुक्त अध्यक्षस्थानी ह.भ.प.लालासाहेब (नाना) पवार आणि देवळा गावचे सरपंच रावसाहेब (नाना) यादव हे होते. कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याला विशेष अतिथी म्हणून शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदासराव आपेट, बीड जि.प.चे माजी शिक्षण व आरोग्य सभापती राजेसाहेब देशमुख, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे, शेतकरी नेते अच्युतराव गंगणे, राज्य कोअर कमिटीचे सदस्य सत्तार पटेल, लातूर



जिल्हाध्यक्ष अरूण कुलकर्णी, मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव, संभाजी ब्रिगेडचे (बीड पूर्व) जिल्हाध्यक्ष प्रवीण उत्तमराव ठोंबरे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनुरथ काशीद, नवनाथ शिंदे, रामराव बाबा लोमटे, विष्णु काका शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. या मेळाव्याचे प्रास्ताविक मेळाव्याचे निमंत्रक तथा क्रांतीकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी केले. यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांशी संवाद साधताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत. शेतकरी विरोधी धोरणामुळे शेतकऱ्यांचे मरण दारात आहे अशा परिस्थिती मध्ये कुठलाही पक्षीय अभिनिवेश न बाळगता आम्ही सर्वजण शेतकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहू व शेतकरी चळवळीची वज्रमूठ आवळू असे आश्वासन देशमुख यांनी दिले. तर यावेळी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी न्याय मिळवण्यासाठी शेतकरी संघटनेने दिलेल्या एक कलमी कार्यक्रमाची कृती करण्याची गरज असून देवळा परिसरात यापूर्वी झालेल्या ऐतिहासिक ऊसाच्या झोनबंदी आंदोलनाच्या आठवणी जाग्या करून आगामी कर्जमुक्ती आंदोलनात मांजरा बेल्ट मधील शेतकरी मागे राहणार नाहीत. याची दक्षता घेण्याचे आवाहन शेतकरी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष कालिदासराव आपेट यांनी उपस्थितांना केले. तसेच याप्रसंगी गावगाड्यातील सामान्य शेतकऱ्यांच्या तरूण मुलांनी आगामी कर्जमुक्तीच्या आंदोलनात उतरून आपल्या मायबाप शेतकऱ्यांचा परत आत्मसन्मान मिळविण्यासाठी हीच एकत्र येण्याची योग्य वेळ आहे. आपण सर्वच युवा शेतकऱ्यांनी हे आंदोलन ताकदीने पुढे नेण्याचे आवाहन क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांनी आपल्या प्रास्ताविकात केले. कर्जमुक्ती एल्गार मेळाव्याच्या यशस्वितेसाठी अरूण आबा पवार, भास्करराव आगळे, नारायणराव मुळे, ॲड.राजेश शिंदे यांनी पुढाकार घेतला.

# बीड जिल्ह्यातील या भोंदू लोकांवर होणार कार्यवाही - हनुमंत भोसले

**प्रतिनिधी @ केज**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बीड जिल्ह्यातील भोंदू लोकांची माहिती मागवली असता पुढील लोकांबद्दल तक्रारी व माहिती प्राप्त झाली आहे.यामध्ये बीड शहरात जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या पाठीमागे बशीर गंज येथे मुफ्ती ताहेर नावाचा व्यक्ती, बीड शहरात पेठ बीड च्या चांदणे वस्तीत चांदणे नावाची महिला,माजलगावच्या स्टॅण्ड समोर अतुल बाबा नावाचा व्यक्ती,नांदलगाव ता.गेवराई येथील जटाळ नावाचा व्यक्ती,सिरसाळा ता. परळी येथील शेख नावाचा व्यक्ती,केज तालुक्यातील नांदूरघाट येथील फक्राबाद रस्त्यावर कवडे नामक व्यक्ती,केज तालुक्या तील बोबडेवाडी-गांजी परिसरात करपे नामक व्यक्ती,वडवणी तालुक्यात चिंचोटी- हरिश्चंद्र पिंपरीपरीसरात उजगरे नावाची महिलावरील लोकांबद्दल जिल्हा समितीला सखोल माहितीमिळाली असून समिती या सर्व माहितीची शहानिशा करत असून पुरावेगोळा करत आहे.वरील लोकांच्याबद्दलआणखी माहिती फोटो,व्हिडीओ किंवा कॉल रेकॉर्डिंग च्या



स्वरूपातअसल्यास जनतेने बीड जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे ९४२३७३३८८८ या व्हाट्सअप्प क्रमांकावर पाठवावी.या लोकांवर महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यात येणार आहे.जिल्हा समितीने लोकांविरोधात मोहीम उघडली असून त्यांच्याबद्दल कायद्याला आवश्यक अधिकची माहिती व पुरावे गोळा करत आहे.समाजातील गरिबी,बेरोजगारी व दैनंदिन प्रचंड समस्या असणारा समाज नाईलाजाने व कंटाळून मानसिकसमाधानासाठीअशा भोंदू लोकांकडे वळतात.हे लोक समाजाच्या स्वास्थ्य व सुरक्षेसाठी खूपच घातक व धोकादायक आहेत.हे लोक देवी -देवता व चमत्काराचा आधार घेऊन लोकांची आर्थिक लूट,महिलांचे लैंगिक शोषण व समाजाचे मानसिक शोषण करत आहेत. प्रत्यक्षात यांच्या या वाईट कृत्याचा व देव - धर्माचा दुरुनही कांहीच संबंध नाही.केवळ आपले वाईट कृत्य लपवण्यासाठी ते धार्मिक भावनेचा वापर करतात.समाजानेयांच्या कडे दुर्लक्ष केल्याने हेच लोक पुढेचालून नरबळी सारख्या अघोरी कृत्या कडे वळतात.यातील बहुसंख्य लोक करणी, भानामती यासारख्या काल्पनिक बाबींचा संदर्भ देऊन शेजारच्या किंवा नात्यातील व्यक्ती नेच तुमच्यावर करणी किंवा भानामती केली आहे असे सांगून समाजात व नात्यात भांडणे लावत आहेत. कांही ठिकाणी या भांडणामुळे अनेक ठिकाणी जीव गेले आहेत.यातील बहुतांशी भोंदू लोकांच्या मनात भीती उत्पन्न करण्या साठी नारळ,लिंबे, उदबत्ती,बाहुल्या या सारख्या साहित्याचा वापर करतात.अशा बाबीवर महिला सहज विश्वास ठेवत असल्याने महिलावर्ग या लोकांचे प्राथमिक लक्ष्य बनलेले आहे.पैसे किती घ्यायचे हे ग्राहकाची परिस्थिती ओळखून ठरविले जातात. भोंदूगिरीमध्ये आर्थिक व मानसिक शोषणा सोबतच महिलांचे लैंगिक शोषण मोठ्या प्रमाणात होत आहे मात्र आपली प्रतिष्ठा, बदनामी व भीतीपोटी भोंदूगिरीची शिकार बनलेले लोक गप्प बसनेच पसंत करतात.

बीड जिल्हा भोंदूगिरी मुक्त करण्याचा समिती चा निश्चय असून या लोकांशिवाय आणखी कोणी लोक आपल्या परिसरात भोंदूगिरी करून लोकांचे शोषण करत असल्यास बीड जिल्ह्यातील जनतेने ९४२३७३३८८८ या व्हाट्सअप्प क्रमांकावर कळवावे असे आवाहन जिल्हाकार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण व जिल्हाध्यक्ष हनुमंत भोसले यांनी केले आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या तालुका अध्यक्ष पदी अशोक पौळ यांची निवड

**प्रतिनिधी @ माजलगांव**

वंचित बहुजन आघाडीच्या माजलगाव तालुका कार्यकारिणी ची निवड करण्यात आली आसुन वंचित बहुजन आघाडीच्या निरिक्षकांनी सादर केलेल्या अहवाला वरुन प्रदेश अध्यक्षा आद.रेखाताई टाकुर यांनी माजलगाव तालुक्यात भारिप बहुजन महासंघा पासुन ते वंचित बहुजन आघाडीत विविध पदावर काम करणारे निष्टावंत कार्यकर्ते अशोक पौळ यांच्या कामावर विश्वास ठेऊन त्यांची तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली या बरोबरच वंचित बहुजन आघाडीचे उपाध्यक्ष पदी संदिप फंदे,भानुदास साळवे, रामेश्वर उदमुले,अनिल साळवे तर महासचिव पदी समाधान गायकवाड, संघटक पदी रामा देशमाने,सह संघटक पदी सर्जेराव



शिंदे ,प्रफुल्ल डोंगरे सहसचिव पदी किशोर कांबळे यांची ही निवड करण्यात आली अशोक पौळ व त्यांच्या कार्यकारिणी चे सर्व स्थारातुन अभिनंदन होत असुन वंचित बहुजन आघाडीच्या निष्टावंत कार्यकर्त्याला न्याय मिळाला असुन आता वंचित चे काम आता जोमाने वाढणार आसल्याचे जनसामान्यातुन बोलले जात आहे

## पान १ वरून...

### जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ...

सुद्धा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याच बरोबर टीएसपी खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असून डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टीएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखील डीएपी खतास उत्तम पर्याय आहे.

अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. पर्यायी खतांचा वापर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी करावा डीएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टीएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखील डीएपी खतास उत्तम पर्याय आहे.

चालू खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांनी केवळ डीएपी खतावरच अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी करावा.साहिल सय्यद, ह्व कृषी विकास अधिकारी, जि .प बीड

### पिंपळनेर,पेंडगाव, ...

कचरू महाराज कदम, राजेश्वर सातपुते, मा. पं. स.सदस्य किशोर काळकुटे, सरपंच सोमनाथ पवार,उपसरपंच चद्रकांन्त कोसले,

कृष्णा भागडे, श्रीराम घोडके, जीएस चौधरी, अजिंक्य जगदाळे, जगन्नाथ घोडके ,महारुद्र वाणी, शेख नासिर, संतोष चौधरी, गणेश चौधरी, विशाल रसाळ, सखाराम काळकुटे, जालिंदर सावंत, गणेश कदम ,अमोल सावंत, कृष्णा सावंत ,सुभाष काळकुटे, दत्ता जगदाळे, गणेश जगदाळे ,अतुल बडगे ,सतीश कागदे आदी उपस्थित होते.

### अजितदादा पवार यांच्या...

निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करण्याचे काम प्रमाणिकपणे सुरु आहे. अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई शहरातील अनेक विकासाची प्रलंबित कामे पुर्ण होत असल्याचा आनंद आहे. शहरातील गोर-गरीबांचे अतिक्रमण नियमाकुल करण्याचे काम आम्ही केले, या पुर्वीच्या सत्ताधार्यांनी स्वता:ची अतिक्रमणे नियमाकुल करण्यासाठी सत्तेचा वापर केला. अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेला शहराच्या हद्दवाढीचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार असल्याची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिली. माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे व त्यांच्या सहकार्यांच्या पक्ष प्रवेशाची घोषणा पत्रकार परिषदेत आ. पंडित यांनी केली.

चांगले काम करणार्या शिवछत्र परिवारा सोबत राहणार – महेश दाभाडे

शिवछत्र परिवाराने कधीही सुडाचे राजकारण केले नाही, ज्यांच्या विरोधात मी लढलो त्यांनी मला जवळ केले हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. भैय्यासाहेब आणि विजयसिंह पंडित ग्राऊंड लेवलला राहुन काम करतात, त्यांना सामान्यांच्या प्रश्नांची जाण आहे. माझ्या सोबतच्या कार्यकर्त्याला राजकारणात सन्मानाचीवागणुक मिळावी यासाठी शिवछत्र परिवारासोबत भविष्यात काम करणार असल्याचे माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांनी यावेळी सांगितले.

### पालकमंत्री अजित दादा बीड ...

गरजवंत यांच्या मदतीसाठी सदैव पुढाकार घेणाऱ्या त्यांच्यासाठी इतर जिल्ह्यातून मदतीचा पदर पसरवून खऱ्या गरजवंतांपर्यंत मदत पोहोचवताना येणाऱ्या अनंत अडचणींना हसत खेळत स्वीकारणाऱ्या एका सामाजिक कार्यकर्तीला भ्रमणध्वनीवर एका कामांध व्यक्तीने संपर्क केला.त्याने सुरुवातीला सोशल वर्कच्या माध्यमातून संपर्क वाढवला आणि नकळतपणे अश्लील मेसेज सुरू केले. त्याला त्या संबंधित सामाजिक कार्यकर्तीने अनेक वेळा समजावले. मात्र त्याने आपला रेटा काही सोडला नाही. प्रकरण इतक्या टोकावर गेलं की त्याने नको ते विभस्य फोटो काढून सोशल मीडियाच्या माध्यमातून पाठवत परेशान करून सोडल. काहीही झालं तरी तू मला हवी आहेस ? मी तुला माझे केल्याशिवाय सोडणार नाही ? असं बरंच काही त्याने सुरू केल. ती प्रेमाने ऐकत नसल्याने त्याने मग धनाचे लालूच दाखवले. एवढ्यावरच न थांबता मग त्याने बळाचा वापर करत धमकावणे ही सुरू केले.संबंधित व्यक्तीकडून अगदी खालच्या पातळीवर जाऊन त्रास होऊ लागल्याने त्या सामाजिक कार्यकर्तीने थेट पोलीस स्टेशन गाठले आणि लेखी तक्रार दिली. मात्र संबंधित ठाणे प्रमुखाने तक्रारीची साधी एनसी सुद्धा दाखल करून घेतली नाही. केवळ तक्रारीच्या आधारावर संबंधित व्यक्तीला भ्रमणध्वनीवरून कॉल करत पोलिसी खाक्यात ठणकावले. त्यानंतर मात्र काय झाले ? माहित नाही. मात्र अजूनही या प्रकरणी पोलीस स्टेशनला तक्रार दाखल नाही. अजूनही त्या सोशल वर्क करणाऱ्या महिलेचा त्रास संबंधित व्यक्तीकडून कमी झालेला नाही. ती त्या व्यक्तीपासून पीडित झाली आहे. या त्रासापोटी जर नको ती काही घटना घडली तर त्याला जबाबदार कोण ? त्या सामाजिक कार्यकर्ते असलेल्या महिलेला संरक्षण कोण देणार ?

दादा आपण त्या प्रकरणाचा पालक म्हणून छडा लावा...

बीड जिल्ह्यातील एका सामाजिक कार्यकर्तीला जबाबदार असलेल्या व्यक्तीकडून अश्लील मेसेज,अश्लील फोटो, अश्लील आणि धमकावणारे कॉल्स येत असून त्या व्यक्तीपासून ती हैराण झाली आहे. जर एखाद्या व्यक्तीकडून शेवटच्या टोकापर्यंत त्रास होत असेल तर सहनशीलतेला देखील मर्यादा असते. जर ही मर्यादा संपली तर बीड जिल्हा पुन्हा एकदा कलंकित चर्चेत येईल. तेव्हा दादा आपण पालकत्व स्वीकारून या प्रकरणाचा छडा लावावा आणि न्याय द्यावा अशी आपणाकडून अपेक्षा आहे.

# तिरंगा यात्रेने माजलगाव शहर दणाणले

## तिरंगा यात्रा उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी @ माजलगांव**

भारतीय सैन्याचे मनोबल वाढवण्यासाठी भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ माजलगाव शहरात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते या प्रसंगी नागरिक उत्साहात तिरंगा यात्रेत सहभागी झाले. नागरिकांच्या देशभक्तीपर घोषणांनी शहर दणाणून गेले.

देशाच्या सीमावर आपल्या जवानांनी दाखवलेला पराक्रमाचा त्यागाचा आणि शौर्याचा सन्मान व समर्पण दर्शवण्यासाठी ,व राष्ट्र प्रेमासाठी आणि ऑपरेशन सिंदूर अंतर्गत आपल्या सशस्त्र दलांनी पाकिस्तानातील दहशतवादी अड्डा नष्ट करून टाकले भारतीय संरक्षण दलाच्या या गौरवपूर्व कामगिरीच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात घेण्यात आला. भारत मातेचे प्रतिमापूजन करून संभाजी महाराज चौकातून तिरंगा रॅलीला सुरुवात झाली. वंदे मातरम, भारत माता की जय, हिंदुस्थान जिंदाबाद अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. याप्रसंगी पाटिल गल्ली झेंडा चौक येथिल भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला व शहीद झालेल्या जवानांना दोन मिनिट श्रद्धांजली देण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. या भव्य दिव्य मोटरसायकल तिरंगा रॅलीच्या प्रसंगी भाजपाचे सर्व नेतेगण पदाधिकारी कार्यकर्ते तसेच शिवसेना व राष्ट्रवादीचे पदाधिकारी व व्यापारी यांच्यासह रा. स्व. संघ, रोटरी क्लब व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या तिरंगा रॅलीचे प्रस्ताविक भाजपा शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी तर सूत्रसंचालन माजलगाव ता. भाजपा पात्रुड मंडलाचे अध्यक्ष डॉ. अभिजीत सोळंके यांनी केले व उपस्थित असणाऱ्या सर्वांना तिरंगा रॅली काढून सैनिकांचे मनोधैर्य वाढावे व राष्ट्र प्रेमासाठी व ऑपरेशन सिंधू अंतर्गत आपल्या सशस्त्र दलाने पाकिस्तानातील दहशतवादी नष्ट करून टाकले या सह विविध माहिती देत अमरनाथ खुरपे यांनी मार्गदर्शन केले तर आभार प्रदर्शन कीट्टी आडगावच्या भाजपा ता. मंडल अध्यक्ष रूपाली कचरे यांनी केले.

यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ प्रशांत पाटील अरुण राऊत डॉ अशोक तिडके ज्ञानेश्वर मेंडके शिवसेना तालुका अध्यक्ष तुकाराम येवले अच्युतराव लाटे, संभाजीराव शेजूळ गोविंद बजाज प्रकाश दुगड शशीकिरण गडम

अभय कोकड , बंडू खांडेकर, माऊली सरवदे प्रल्हाद दळवे सुरेंद्र रेदासनी शरद कचरे आनंत कुलकर्णी निरंजन वाघमारे सत्यनारायण उनवणे ईश्वर खुरपे अविनाश कांडुरे पांडुरंग झोडगे उमेश जाधव राम शिंदे नवनाथ गायकवाड सुभाष साळवे सुभाष कांबळे खय्यम पठाण कल्याण शेप पवन मोगरेकर रमेश शेंडगे मनोज कोरडे नामदेव मुळे यासह विविध नेतेगण या सह अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मोठ्या उत्साहात तिरंगा यात्रेत सहभागी झाले होते.

# उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम

**प्रतिनिधी @ बीड**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार उद्या सोमवार, दि. १९ मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे.सकाळी ८:०५ वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण.सकाळी ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण.

सकाळी ९:०० वाजता शासकीय विश्रामगृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ९.०० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी १०.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ११.३० वाजता श्री. राजकिशोर मोदी यांचे निवासस्थान, गुरुवार पेठ, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ११.३० ते १२.३० राखीव. दुपारी १२.४५ वाजता कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील हेलिपॅड येथे आगमन. दुपारी १२.५० वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. दुपारी १.१५ वाजता पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. नंतर मोटारीने प्रयाण. दुपारी १.२० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आगमन. दुपारी १.३० वाजता बीड जिल्हा नियोजन समितीची बैठक. दुपारी ३.३० वाजता बीड जिल्हास्तरीय खरीप हंगाम पूर्व सन २०२५-२६ आढावा बैठक. सायं. ४.३० वाजता बीड जिल्ह्यातील विविध विकासकामे तथा योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक. नंतर पत्रकार परिषद. त्यानंतर मोटारीने गेवराईकडे प्रयाण. सायं ७.०० वाजता कृष्णाई निवास, जुन्या बस स्टँड समोर, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.०० वाजता राखीव . नंतर मोटारीने प्रयाण. सायं ७.३० वाजता आर.बी. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई जिल्हा बीड येथे आगमन. सायं ७.३० वाजता विविध विकास कामांचा शुभारंभ. नंतर राखीव. रात्री ९.४५ वाजता मोटारीने छत्रपती संभाजीनगर कडे प्रयाण.

# संत वामनभाऊ इन्फ्रा हॉट मिक्स डांबर प्लांटमुळे परिसरातील रस्त्यांची गुणवत्ता सुधारेल - आ.सुरेश धस

## आष्टी तालुक्यातील सर्वात पहिला डांबर प्लांट, आ.सुरेश धस यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

प्रतिनिधी @ आष्टी

आपल्या परिसरात डांबर प्लांटची आवश्यकता होती. आपल्या परिसरातील रस्ते डांबरीकरण करण्यासाठी मटेरियल बाहेरून आणावे लागत होते. त्यासाठी वेटींग असायची. महिना - महिना ताटकळत बसावे लागत होते. आता संत वामनभाऊ इन्फ्रा हॉट मिक्स डांबर प्लांटमुळे ही गरज शहादेव वनवे, नारायण वनवे, इंजि. ज्ञानेश्वर तांदळे यांनी पूर्ण केली असून यामुळे परिसरातील रस्त्याच्या कामाचा दर्जा नक्कीच सुधारेल असे प्रतिपादन आष्टी - पाटोदा - शिरूर मतदार संघाचे आ. सुरेश धस यांनी व्यक्त केले ते आष्टी तालुक्यातील वेताळवाडी (किन्ही) येथील संत वामनभाऊ इन्फ्रा हॉट मिक्स डांबर प्लांटच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते फित कापून या प्लांट चे उद्घाटन करण्यात आले. पुढे बोलतांना धस म्हणाले की, आष्टी तालुक्यात हा डांबर प्लांटची नितांत गरज होती, कारण तालुक्यात अनेक कॉन्ट्रॅक्टर आहेत. त्यांना रस्त्याचे काम करताना वेळेवर डांबर मिळत नसल्याने कामे थांबली जायची ते वेळेवर होत नव्हते. आता कामाला नक्कीच गती मिळणार आहे. कामे करताना कामाला दर्जा द्या, दर्जेदार कामे करा तसेच ते पुढे म्हणाले, पहिलगाम ची घटना खरोखर वाईट झाली. धर्म विचारून निंदणी कृती केली गेली. अनेक माया माऊलीची कुंकू पुसले गेले. पाकिस्तानची टिकली सुद्धा भारतात येऊ शकली नाही, त्यामुळे सर्व जनता पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवरांचा सत्कार प्लांट चे मालक नारायण वनवे, शहादेव वनवे, इंजिनिअर ज्ञानेश्वर तांदळे यांनी केला. यावेळी ह. भ. प. आदिनाथ महाराज आंधळे, ह. भ. प. रोहिदास महाराज शास्त्री, ह. भ. प. काशिनाथ महाराज शास्त्री, ह. भ. प. राम महाराज शास्त्री, अशोक गर्जे, बिराजदार यांचे समयोचीत भाषणे झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी केले. या कार्यक्रम प्रसंगी ह. भ. प. विठ्ठल महाराज महंत गहिनीनाथ गड, ह. भ. प.



काशिनाथ महाराज, ह. भ. प. आदिनाथ महाराज, ह. भ. प. रोहिदास महाराज, ह. भ. प. राम महाराज शास्त्री, किशोर हंबर्डे, मा. सभापती बद्रीनाथ जगताप, नामदेव राऊत, एन. टी. गर्जे, संजय गाढवे, शिवाजी नाकाडे, गीते साहेब, अशोक गर्जे, मा. कृषी सभापती शत्रुघन मरकड, ज्येष्ठ नेते विष्णुपंत चव्हाण, विजय गाढवे, युवा नेते अमोल शिंदे, प्रविण वारे, बबन तळेकर, अमोल राजे तरटे, अनुराध सानप, विकास गोल्हार, बाळासाहेब निकम, विनायक मुळीक, बबन वायभासे, आदिनाथ सानप, बाबुराव केदार, आत्माराम फुंदे, ज्ञानदेव गीते, बबन कारंडे, विलास वायभासे, राजेंद्र गोल्हार, संतोष भवर, तुकाराम भोर, राजेंद्र गोल्हार, नामदेव काकडे, बबन आबा काकडे, सरपंच बाळासाहेब वनवे, भरत भवर, अशोक इंगोले, शरद भवर, सुनील वनवे, रोहिदास नागरगोजे, शिवाजी इंगोले, सोमनाथ वनवे, काका नागरगोजे, लहू वनवे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार मा. सरपंच देवळाली हरिभाऊ तांदळे यांनी मानले.

# बारगजवाडी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



प्रतिनिधी @ मानुर

ह्व

बारगजवाडी (ता. शिरूर कासार जि.बीड ): दिनांक १८ मे रोजी बारगजवाडी गावात दहावी व बारावी परीक्षेत उत्तम यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. गावकऱ्यांच्या पुढाकाराने व सहभागाने हा कार्यक्रम अत्यंत देखण्या पद्धतीने संपन्न झाला.

कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन सामाजिक कार्यकते श्री. संजय काशिनाथ आघाव यांनी केले. यावेळी मार्गदर्शन करण्यासाठी प्रा . श्री अंबादास बारगाजे सर ,श्री. विकास आघाव सर, श्री. देविदास बारगजे सर मित्र परिवार लोणी ग्रामपंचायत आजी माजी सरपंच व तसेच गावातील अनेक मान्यवर ,माता भगिनी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणादायी विचार व्यक्त करत पुढील शिक्षणात सातत्य ठेवण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमाला प्राचार्य कानिफनाथ गोरे सर व प्राध्यापिका शिल्पा गोरे मॅडम, उद्योजक पोपट बडे ,किसनदेव बडे व गावातील अनेक ग्रामस्थ, पालक व विद्यार्थी ,माता भगिनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थी व पालक यांच्यात नवचैतन्य निर्माण झाले असून ग्रामविकासात शिक्षणाचे मोल अधोरेखित झाले.



# केज येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट सदस्य नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

## रमेशराव आडसकर यांच्या पाठीशी अजित दादा ठामपणे उभे आहेत –जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांची माहिती

प्रतिनिधी @ केज

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाच्या सदस्य नोंदणी मोहिमेस केज शहरात नागरिकांचा जोरदार प्रतिसाद लाभला.केज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रांगणात पार पडलेल्या या कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांनी सांगितले की, रमेशराव आडसकर यांना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे पूर्ण समर्थन आहे.या

कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला. केज कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन अंकुशराव इंगळे यांनी आडसकर यांच्या संघर्षमय वाटचालीचे कौतुक करत त्यांच्यासोबत राहण्याचा निर्धार व्यक्त केला.ईश्वर मुंडे यांनी बीड जिल्ह्यात श्री आर फॅक्टर प्रभावी असून, रमेशराव आडसकर हे भावी आमदार होतील असा विश्वास व्यक्त केला.जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांनी यावेळी खुलासा केला की,अजित दादा पवार यांनी स्वत: आडसकर यांना पक्षात आमंत्रित केले असून त्यांना आमदार करण्याचे आश्वासन दिले आहे.अंबाजोगाई साखर कारखान्यासाठी १५० कोटींच्या निधी देण्यात येणार असुन बजेट मध्ये तरतूद करुन अजित दादा पवार देणार असल्याची घोषणाही यावेळीत्यांनी केली.रमेशराव आडसकर यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना, प्रत्येकाने किमान दहा सदस्यांची नोंदणी करावी,महिलांचा ही सहभाग वाढवावा असे आवाहन केले.तसेच, मांजरा धरणातून दोन टीएमसी पाणी आणण्यासाठी प्रयत्नशील राहणार असून पदाची अपेक्षा न ठेवता जनसेवा करणार आहे असेही त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाला अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे,प्रशांत देशपांडे, मुजफ्फर इनामदार, जलालोद्दीन इनामदार.ऋषीकेश आडसकर,लक्ष्मीकांत लाड,अमर पाटील, अजहर इनामदार, दिलीप गुळभिले, रावसाहेब राऊत आदींसह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात पाच जणांची सदस्य नोंदणी करण्यात आली.

# पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारत देशाशी लढण्याचे स्वप्न बघू नये - आ.सुरेश धस

## भव्य शौर्य तिरंगा यात्रेने..आष्टीकरांचे वेधले लक्ष

प्रतिनिधी @ आष्टी

पाकिस्तान आतंकी स्थान झाला आहे. पाकिस्तानचे सैन्यदल हतबल झाले आहे. मोठ्या - मोठ्या वल्गना करणारे अगर पाणी बंद कर देंगे तो खून की नदिया बहेंगी म्हणणारे पाकिस्तान मंत्रिमंडळ बंकर मध्ये लपून बसले. संपूर्ण जगासमोर पाकिस्तानची नाचक्की झाली आहे. पाकिस्तान सारख्या भिकारी राष्ट्राने भारताशी लढण्याचा विचार ही करू नये. अब नरेंद्र मोदी का नया भारत है, देश मोदी जी के साथ है, और देश सेना के साथ है असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले.आष्टी येथे त्यांनी आयोजित केलेल्या शौर्य तिरंगा यात्रेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर श्रीमती भाकरे, श्रीमती काकडे, श्रीमती कमल सोंडगे, श्रीमती रत्नमाला वाल्हेकर, श्रीमती अरुणा नागरगोजे, श्रीमती भाग्यश्री राख, श्रीमती सीताबाई राख, श्रीमती सीताबाई गायकवाड, श्रीमती तावरे या केवळ वीर पत्नी, वीरमाता यांची उपस्थिती होती. प्रमुख पदाधिकारी व देशप्रेमी नागरीक प्रचंड संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी अंकुश खोटे यांनी स्वर्गीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची ये भारत कोई भूमि का टुकडा नही, ये वंदन की धरती है अभिनंदन की भूमी है ही कविता ऐकवली. सेवानिवृत्त मेजर भोसले यांनी



प्रास्ताविक केले. या संपूर्ण शौर्य तिरंगा यात्रेचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले.

पुढे बोलताना आ. सुरेश धस म्हणाले, २२ एप्रिल रोजी काश्मीर मधील पहलगाम परिसरातील बैसरन व्हॅलीमध्ये पर्यटनाला गेलेल्या भारतीय नागरिकांना विशेषतः पुरुषांना त्यांचा धर्म विचारून गोळ्या घालून मारण्यात आले. कुटुंबीयांदेखत, पत्नी समोर, मुलाबाळांवर समोर विशेषतः केवळ पुरुषांना क्रूर पद्धतीने गोळ्या घालून मारण्यात आले ही अत्यंत अमानवी कृती होती. त्यामुळे या पाकिस्तान पुरस्कृत आतंकवाद्यांना आणि पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी अत्यंत विचारपूर्वक योजना आखून पाकिस्तानला धडा शिकवला आहे. दि. ६ मे च्या रात्री अगोदर पहिल्या दिवशी शंभर ते दीडशे दहशतवाद्यांना कंठस्नान घालून दुसऱ्या दिवशी दि. ७ मे रोजी केवळ २३ मिनिटांमध्ये पाकिस्तानातील प्रमुख नऊ हवाई तळ उध्वस्त करून भारतीय सैन्याने पराक्रमाची गाथा लिहिली आहे. अफगाणिस्तान, अरब अमिराती, या मुस्लिम राष्ट्रांनी आणि दोन तीन देश वगळता संपूर्ण जगाने भारताला पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला केवळ तुर्की आणि अझरबैझान या भिकारी राष्ट्रांनी पाठिंबा दिला आहे.

भारतावर यापूर्वी दहशतवादी हल्ले झाले. २६/११ हा भारत देशावरील हल्ला होता, मुंबई शहरात बॉम्ब स्फोट झाले, शेकडो नागरिक मारले गेले. परंतु तत्कालीन भारतीय पंतप्रधानांकडून केवळ निषेध व्यक्त झाला. पाकिस्तानला चोख उत्तर देण्यात आले नव्हते. परंतु आता भारत बदललेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सैन्य दलाला सूट दिलेली आहे. मोकळीक दिलेली आहे. काही दिवसांपूर्वी याच तुर्कस्तानमध्ये भूकंप झाला असता त्यावेळी त्यांना वैद्यकीय मदत देणारा पंतप्रधान मोदींचा भारत देश हाच सर्वात पुढे होता, मात्र तुर्की देशाने या मदतीची उपकाराची परतफेड अपकाराने केली असून पाकिस्तानला मदत केली आहे.

पाकिस्तान कडे शस्त्र नाहीत, शस्त्र घ्यायला पैसे नाहीत, प्रचंड कर्जबाजारी असल्यामुळे आज पाकिस्तानात महागाईने कहर केला असून जीवनावश्यक वस्तू घेण्यासाठी हजारो रुपये मोजावे लागत आहेत. पाकिस्तानचे सैन्यदल देखील सैन्यदल राहिले नसून ते अतिरेकी झाले आहेत. सैन्यदल आणि अतिरेकी यांच्यात काहीही बदल राहिलेला नाही असे सांगत भारतीय जवानांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ही शौर्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे आणि यामध्ये मतदारसंघातील हुतात्मा झालेल्या वीर सैनिकांच्या कुटुंबीयांचा सन्मान या ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे असे सांगितले. या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेले त्रिदल माजी सैनिक संघटना, नागरिक, व्यापारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी यांचे त्यांनी मनापासून आभार मानले. आष्टीच्या पंचायत समिती येथील हुतात्मा स्मारकापासून हुतात्मा जवानांच्या वीर पत्नी, वीर माता यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारत मातीची प्रतिमा असलेला अश्वारूढ रथ लक्ष आकर्षण घेत होता. बँड पथकाच्या निनादात देशभक्तीच्या नया भारत का जलवा देखा, पाकिस्तान ने मलबा देखा

# दहावी परीक्षेत शंभर टक्के घेणारे २२ विद्यार्थी तर नव्वद टक्क्यांपेक्षा

## जास्त गुण घेणारे ६०४ विद्यार्थी – भाशिप्र कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांची माहिती

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

मराठवाड्याच्या शिक्षण क्षेत्रात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या एकुण १० माध्यमिक शाळांनी दहावीच्या परीक्षेत यशस्वी वाटचाल करीत गुणात्मकदृष्ट्या नामांकन मिळविले. ज्ञान आराधना हेच आमचे आद्य कर्तव्य असुन परीक्षेला एकुण २५५८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २२ मुला-मुलींनी १०० पैकी १०० गुण घेवून उज्वल यश संपादन केले. तर ९० पेक्षा जास्त गुण प्राप्त विद्यार्थी एकुण ६०४ असल्याची माहिती संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी दिली.

भाशिप्र संस्थेच्या वतीने प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी म्हटले आहे की, आमच्या संस्थेच्या एकुण १० माध्यमिक शाळा ज्यामध्ये श्री केशवराज (लातुर), खोलेश्वर (अंबाजोगाई), लोकमान्य टिळक (पोखरी), सिद्धेश्वर (माजलगाव), स्वा.सावरकर (बीड), कै.दत्ताजी भाले (आंबड), आर्य चाणक्य (पैठण), चिंतेश्वर (गेवराई), लाल बहादुर शास्त्री (उदगीर), प.पु.गोळवलकर गुरूजी (देगलुर) आदी ठिकाणी शाळा चालतात. नुकत्याच जाहिर झालेल्या दहावीच्या परीक्षेत एकूण शाळांचा निकाल ९७.८३ टक्के असून गुणवत्तेच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. व आमच्यासाठी ही अभिमानाची गोष्ट नक्कीच आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता



त्याचबरोबर मुला-मुलींचा सर्वांग विकास हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवत संस्था मार्गक्रमण करते आहे. विद्यासभा तथा विविध रचनात्मक समित्या यावर काम करतात. सर्व शाळेत मिळून २५५८ विद्यार्थी यंदाच्या दहावीच्या परीक्षेला बसले होते. १०० पैकीच्या पैकी गुण घेणारे सर्वाधिक १३ लातुर केशवराज शाळेचे तर सिद्धेश्वर माजलगाव येथील ०५ मुलांनी पैकीच्या पैकी गुण घेतले. प.पु.गोळवलकर गुरूजी शाळेच्या तीन मुलांनी तर खोलेश्वर अंबाजोगाई शाळेत एका मुलाने पैकीच्या पैकी मार्कस मिळवले. सर्व शाळेचे निकाल साधारणत: ९८.०० पुढे असून आर्य चाणक्य पैठण शाळा, आणि चिंतेश्वर गेवराई शेकडा निकालात पैकीच्या पैकी गुण संपादन केले. ९० टक्क्याच्या पुढे एकट्या केशवराज शाळेचे २५२ विद्यार्थी हे आमच्यासाठी स्वाभिमानाची बाब निश्चित वाटते. सर्वच शाळेत ९० च्या पुढे, १०० च्या आसपास गुणवत्तेची आघाडी असुन ६०४ एकुण संख्या असल्याचे त्यांनी पत्रकात म्हटले. या संस्थेत काम करणारा शिक्षक हा कार्यकर्त्याच्या स्वरूपाने रात्रंदिवस कठोर परिश्रम घेतो. ज्यामुळे आम्हाला गुणवत्तेत आघाडी निश्चित मिळते. सर्व मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, विभागप्रमुख, शिक्षक व शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग ठिकठिकाणी संस्कार केंद्रात परिश्रम घेतात. ज्यामुळे ज्ञानार्जन यज्ञात मिळालेले यश आम्हा संस्था, पदाधिकारी सहाकार्यांच्यासाठी निश्चितच स्वाभिमान वाटावे असे. दरम्यान सर्व शाळेला मिळालेल्या गुणवत्तापुर्वक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्रजी आलूरकर, विद्यासभा अध्यक्ष डॉ.जयंत जोशी, उपाध्यक्ष उमेश जगताप, संयोजक महेश कस्तुरे, प्रशासकिय अधिकारी चंद्रकांत मुळे आणि सर्व सन्माननीय संचालकांनी विद्यार्थी तथा शिक्षक कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले आहे.

# शेतकऱ्यांनो, खते, बियाणे, कीटकनाशके खरेदी करताना काळजी घ्या–दत्ता वाकसे


प्रतिनिधी @ वडवणी


बीड जिल्ह्यात खरीप हंगाम सुरु असून शेतकऱ्यांना योग्य व उत्तम गुणवत्तेचे बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके पुरविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी निविष्ठा खरेदी करतांना काळजी घेतली पाहिजे. फसवणूक झाल्यास कृषी विभाग कृषी अधिकाऱ्याकडे तक्रार करा, असे आवाहन मल्हार ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे. परवानाधारक बियाणे विक्रेत्याकडून बियाणे खरेदी करावे. सीलबंद वेष्टनातील खूनचिठ्ठी (लेबल) असलेले बियाणे खरेदी करावे. सीलबंद नसलेले बियाणे दर्जाची खात्री नसल्याने ते खरेदी करु नये. खरेदी केलेल्या बियाणाबाबत संपूर्ण तपशील असलेले उदा. पीक वाण, लेबल नंबर, वजन दिनांक, वैध मुदत, बियाणे किंमत, खरीददाराचे, उत्पादकाचे, विक्रेत्याचे नाव तसेच विक्रेत्याची सही इत्यादी रोखी अथवा उधारीची पावती घ्यावी. बियाणे खरेदी करतांना त्यावरील वैध मुदतीची खात्री करुन वैध मुदतीच्या आतील बियाणे खरेदी करावे. छापील किंमतीपेक्षा जादा दराने बियाणे खरेदी करु नये. अशी बाब निदर्शनास आल्यास वैद्यमापनशास्त्र विभागाचे निदर्शनास आणून द्यावे. विशिष्ट संशोधित वाणाचा आग्रह न धरता त्याच गुणधर्माचे अधिसूचित वाणाचे प्रमाणित बियाणे शक्यतो खरेदी करावे. बियाणे खरेदी केल्यानंतर खरेदीची पावती वेस्टन व त्यावरील लेबल व पिशवीतील थोडेसे बियाणे हंगाम संपेपर्यंत जपून ठेवावे. बियाणे दर्जा उगवण क्षमता भौतिक शुध्दतेबाबत शंका असल्यास कृषि विभागाच्या नजीकच्या कार्यालयास शेतकऱ्यांनी तक्रार -



नोंदवावी. तालुका स्तरावर कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत. रासायनिक खते खरेदी करतांना परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खरेदी करावे. रासायनिक खते खरेदी करतांना ई-पॉस मशीनद्वारेच खते खरेदी करावीत व तसा आग्रह कृषी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना करावा. विक्रेत्याकडून खरेदी केल्यावर रासायनिक खताचे बील पावती मागून घ्यावी. खरेदी पावतीवर खताचे नाव, ग्रेड, किंमत, उत्पादकाचे नाव यांचा उल्लेख असणे अत्यंत आवश्यक आहे, याची खात्री करुनच बिलावर सही करावी. खत खरेदी करतांना खताचे व त्याच्या वजनाची खात्री करुन घ्यावी. संशयास्पद बनावट खत विक्री तसेच खताच्या कोणत्याही तक्रारीकरीता त्वरित नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा. कमाल किरकोळ विक्री किंमतीच्या अत्यंत कमी अथवा जादा दराने विक्री होत असल्यास त्वरीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आव्हान देखील मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे

# आयडियल इंग्लिश मिडीयम स्कूल चा एसएससी परीक्षेमध्ये १०० टक्के निकाल





प्रतिनिधी @ मानुर

प्रथम खोले श्रावणी किशोर -९४.८०% द्वितीय दुबाळे ओंकार हनुमंत-९४.६०% तृतीय गाडे तेजस बाळू-९४.२०% सातपुते आदित्य रवींद्र-९४.००% भोसले मयूर विठ्ठल-९४.००% गाडेकर श्रुती संदिप-९३.८०% चव्हाण सिद्धी शरद-९३.६०% मंडलेचा संस्कार मनोजकुमार-९३.६०% मोरे सविधान संदेश-९३.६०% फरताडे शुभम संजय-९३.००%

येंडे श्रध्दा संतोष-९३.००% भांडेकर शिवम सुधीर-९२.६०% पवार राहुल राम-९२.६०% शिंदे प्रणव संदिप-९२.६०% जगताप आदित्य भद्रीनाथ- ९२.२०% खामकर विनोद अजिनाथ-९२.२०% खेडकर शौर्य सुधाकर-९२.२०% इंगळे अंकिता गोकुळ-९१.६०% गायकवाड आदित्य हनुमान-९१.४०% केदार निखिल रमेश-९०.८०% भालेराव आयुष अरुण-९०.६०% पठाण अयान शिराज-९०.६०%पवार पियुष हनुमंत-९०.६०% बडे कृष्णा बापूराव-९०.४०% वनवे रोहन लक्ष्मण-९०.४०% पालवे साक्षी नारायण-९०.२०% देशपांडे नंदिनी गणेश-८९.८०% सुरे गायत्री श्रीकृष्ण -८९.४०% जायभाये विवेक एकनाथ-८९.४०% कातखाडे अथर्व महादेव-८९.००% सानप राजनंदिनी वासुदेव-८८.८०% पवार अभिजित किशोर-८८.६०% अंदुरे आयुष राजेंद्र-८८.४०% बडे रिद्धी विठ्ठल-८७.८०% शेख अबुजर यासीम-८६.८०% कातखडे शुभम भगवान-८५.८०% भांडेकर सागर प्रकाश ८५.२०% केदार रुषिका लक्ष्मण-८०.४०% दळे ओंकार संतोष -७६.००% मुख्याध्यापाक राकेश पवार व सर्व शिक्षक वृंद संस्थाचालक डॉ. भगवान सानप, अभिजीत डुंगरवाल, प्रकाश देसरडा, संतोष ढाकणे, विनोद डुंगरवाल, किरण देसरडा राजेंद्र मंडलेचा, गणेश देशपांडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा

# आरोपी कोणीही असू द्या ; संघटित हल्ला करणाऱ्यांवर मोक्का लावा - राजेसाहेब देशमुख

## शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना भेटणार

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

मयत संतोष देशमुख पार्ट–२ करायचा अशा नीच मानसिकतेतून शिवराज दिवटे (रा.परळी वैजनाथ) या तरूणाचे शुक्रवारी संध्याकाळी अपहरण करून त्याला लाकूड, लोखंडी रॉड, कत्तीने मारहाण केली. डोक्यात बाटलीही फोडली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून काही जणांना अटकही केली आहे. असे समजते. आम्ही या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करतो आहोत. आरोपी हा कोणीही असू द्या, कोणत्या ही जाती–धर्माचा असू द्या संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून निरापराध लोकांवर भ्याड हल्ला करणाऱ्यांवर तात्काळ मोक्का लावा, अशा गुंडांची पोलिसांनी गावातून धिंड काढावी. त्यांचेवर कायद्याचा जरब बसवून अशा प्रवृत्ती ठेचून काढा. शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी आपण मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना, पोलिस आयुक्त व बीड जिल्हा पोलिस अधीक्षक यांना लवकरच भेटणार आहोत असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख यांनी सांगितले.

आमच्या प्रतिनिधीशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब देशमुख म्हणाले की, बीड जिल्ह्यातील परळी येथे शुक्रवारी संध्याकाळी शिवराज दिवटे या तरूणाला एका टोळक्याने अपहरण करून त्याला रत्नेश्वर डोंगराच्या भागात नेले आणि बांबू, लाकडाने अमानुष व बेदम मारहाण केली, डोक्यात काचेची बाटली फोडली. या टोळीकडे लोखंडी रॉड आणि कत्तीसारखी घातक शस्त्रे असल्याचे ही समजते. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मारहाण झाल्यानंतर शिवराज हा गंभीर जखमी झाला होता. त्याला तात्काळ रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. या सगळ्या प्रकारानंतर शनिवार रोजी आम्ही जखमी शिवराज दिवटे व कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी शिवराजने आपल्याला लोखंडी रॉड आणि कत्तीने मारहाण झाल्याचे आम्हाला सांगितले. तसेच टोळक्यातील काहीजण, याचा संतोष देशमुख पार्ट–२ करायचा, असे म्हणत असल्याचेही शिवराजने सांगितले.

खरे तर शिवराज हा जलालपूर येथे सप्ताहाच्या जेवणासाठी गेला होता. जेवणानंतर तिथे या टवाळखोरांना गावातील काही जणांनी मुलींची छेडछाड करण्यापासून रोखले होते. यावेळी शिवराज हा तिथे फक्त उभा होता. त्यानंतर शिवाजीनगरला तो मित्राला सोडून रिलायन्स पेट्रोल पंपाकडे जात होता. यावेळी जलालपूर येथील घटनेचा राग मनात धरून रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ पाच गाड्यावरील पोरांनी रस्ता रोखत शिवराजला मारहाण केली आणि त्याला बळजबरीने रत्नेश्वर डोंगरावर घेऊन गेले. त्याला मारहाण करताना ते टोळके बोलत होते की, याला सोडायचे नाही, आता याचा संतोष देशमुख पार्ट–२ करायचा. परंतु, तेथील दोन माणसांनी जर शिवराजला मारताना वेळीच बघितले नसते तर तो आज जिवंत ही राहिला नसता. त्यामुळे या विकृतीला काय म्हणणार ? गुन्हेगाराला आणि गुन्हेगारीला जात नसते आणि गुन्हेगारी कोणाचीही असेल तर ती वाईटच असते,



बीडमध्ये वाढणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांवर पोलिसांनी आता धडक मोहीम राबवावी. मोक्कार तरूणांवर, अपप्रवृत्तींवर कायद्याची जरब बसवली पाहिजे, गुन्हेगारांना अद्दल घडवली पाहिजे, बीड जिल्ह्यात बिहारला ही लाजवेल असा बिनधास्त गुन्हेगारीची मानसिकता असलेला नवा ट्रेंड सुरू झालाय तो थांबवा. बीड जिल्ह्यातील तरूण आज गुन्हेगारीच्या विळख्यात अडकला आहे. मारहाण, अपहरणाचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल करून समाजात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न विकृत टोळके करीत आहेत. त्यामुळे याच्या प्रतिबंधासाठी पोलिसांनी वेगळे पथक नेमावे, स्थानिक पातळीवर पोलिसांनी गुप्तचर यंत्रणा कार्यक्षम करावी, प्रसंगी गुन्हेगारांच्या आर्थिक स्रोतांवर गदा आणा. अशा लोकांवर पोलीसांची करडी नजर असणे ही तितकेच आवश्यक आहे. शिवराज दिवटे प्रकरण केवळ एक गुन्हेगारी घटना नाही. तर ती सामाजिक व्यवस्थेतील अस्वस्थतेची जाणीव करून देते. स्व.संतोष देशमुखांपासून ते शिवराज दिवटेपर्यंत ही मालिका फक्त नावं बदलते आहे. पण, मूळ कारणं तीच आहेत, संघटित गुन्हेगारीचा पॅटर्न मात्र तोच दिसतो आहे. सत्ता, वर्चस्व, कायद्याच्या भीतीचा अभाव. आता बीड जिल्ह्याने ठरवलं पाहिजे की, यापुढे अशा घटना आपल्या परिसरात सहन केल्या जाणार नाहीत. समाजाने, प्रशासनाने आणि सर्वपक्षीय राजकीय नेतृत्वाने एकत्र येऊन अशा संघटित हिंसेविरूद्ध उभं राहणं ही काळाची गरज आहे. अन्यथा उद्याचं बीड हे सर्व प्रकारच्या गुन्हेगारीचं नंदनवन होईल. चांगल्या लोकांना जगणे मुश्किल होईल. म्हणून अजून वेळ गेलेली नाही. संघटित गुन्हा वेळीच रोखला जावा, अशा हिंसक घटनांमागील राजकीय पाठबळ, धागेदोरे यांचा शासन व प्रशासनाने शोध घेवून ते सत्य समाजासमोर आणले पाहिजे. आम्ही या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करतो आहोत. आरोपी हा कोणीही असू द्या, कोणत्या ही जाती–धर्माचा असू द्या संघटित गुन्हेगारीच्या माध्यमातून निरापराध लोकांवर भ्याड हल्ला करणाऱ्यांवर मोक्का लावा, अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांची पोलिसांनी गावातून धिंड काढावी. त्यांचेवर कायद्याचा जरब, धाक बसवून अशा प्रवृत्ती ठेचून काढा. त्यांना प्रतिबंध करा, अशा खलप्रवृत्तींना कुठलीही माफी देवू नये. तर कठोर कारवाईचे शासन करावे अशी राज्य सरकारकडे विनंती व मागणी करून शिवराज दिवटे भ्याड हल्ला प्रकरणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार, पोलिस आयुक्त आणि बीड जिल्हा पोलिस अधीक्षक नवनित काँवत यांना लवकरच भेटणार आहोत असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेसाहेब

# जय हनुमान कुस्ती संकुलाच्या २५ व्या रोप्य महोत्सव वर्धापन दिन

प्रतिनिधी @ पाटोदा



येथील जय हनुमान कुस्ती संकुलाच्या २५ व्या रोप्य महोत्सव वर्धापन दिनानिमित्त आयोजित भव्य कुस्ती मैदानास उपस्थित राहुन कुस्तीचा आनंद घेताणा आमदार सुरेश धस पाटोदा प्रतिनिधी,दि.१८.रोजी पाटोदा येथील जय हनुमान कुस्तीच्या आखाड्यात आ.सुरेश धस यांनी उपस्थित राहुन कुस्ती चा आंनद घेतला यावेळी मंचावर राष्ट्रीय कुस्तीपटू पै. राहुल आवारे (पोलीस उपधिक्षक) यांच्यासह पाटोदा, जामखेड आष्टी, परंडा, भूम व परिसरातील विविध कुस्ती संकुलनातील पैलवान मंडळी पंचमंडळी व त्यांचे वस्ताद या वर्धापन दिनानिमित्त उपस्थित होते.

पै. बाळासाहेब (आबा) आवारे यांनी तिसऱ्या पिढीवरती कुस्तीला जिवंत ठेवले आहे. बाळासाहेब आवारे यांचे चिरंजीव पै. राष्ट्रीय कुस्तीपटू राहुलजी आवारे यांनी पाटोदा शहराचे नाव राष्ट्रीय स्तरावरती नेले आणि पुढच्या पिढीसाठी कुस्तीला जिवंत ठेवले. दिघोळ गावातून स्थलांतर करत आबा पाटोदा येथे आले. याठिकाणी त्यांनी कुस्तीला सर्वस्व मानून गावाखेड्यातील कष्टाळू व जिद्दी मुलांमध्ये कुस्तीचे आकर्षण निर्माण केले. उत्तम प्रशिक्षणाने आणि मेहनतीने आबांनी उत्तम कुस्तीपटू बनवले. हे मल्ल आज राज्याच्या विविध कुस्ती मैदानामध्ये नाव गाजवत आहेत. तसेच शासकीय सेवेमध्ये सुद्धा ते विविध पदावर काम करत आहेत. भविष्यात जय हनुमान कुस्ती संकुलनाचा विस्तार करावा लागेल आणि या कुस्ती संकुलनाला जामखेड, आष्टी आणि अन्य ठिकाणी पोहचवावे लागेल, त्याची नवी उभारी करावी लागेल असा आशावाद आमदार धस यांनी आबांसमोर व्यक्त केला. यावेळी जय हनुमान कुस्ती संकुलाच्या सर्व पैलवान आ.सुरेश धस व माजी आमदार भिमराव धोडे यांनी मंडळींना शुभेच्छा दिल्या.

# रेल्वे मार्गावर फुल उभारण्याची बाहेगव्हाण करांची मागणी

प्रतिनिधी @ वडवणी



नगर बीड परळी रेल्वे मार्गामुळे बाहेगव्हाण वडवणी शिवाराचे दोन भाग झाले आहेत. या मार्गावर पूल नसल्यामुळे शेतकरी शेतमजूर आणि व्यवसायिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे या ठिकाणी तत्काळ पुलाची उभारणी करावी अशी मागणी बाहेगव्हान आणि वडवणी येथील नागरिकांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केलेली आहे.

मागील पाच वर्षापासून बाहेगव्हाण आणि वडवणी येथील नागरिक जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे पाठपुरावा करत आहेत. त्यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदने दिले आहेत. बीड नगर परळी रेल्वे मार्ग वडवणी येथून जात असून रेल्वेमार्गासाठी खोलवर खोदकाम करण्यात आलेले आहे. सदर रेल्वे मार्ग झाल्यामुळे शिवाराचे दोन भाग झाले आहेत. पलीकडील बाजूस जाता येत नाही. शेळी मेंढी पालन करणाऱ्यांचे हाल होत आहेत. त्याचबरोबर पलीकडील शेतकरी शेतमजुरांना प्रवास करता येत नाही. धार्मिक कार्यक्रमास रेणुका माता मंदिर आणि पावतका मातेच्या मंदिरात देखील भाविकांना जाण्यासाठी रस्ता नाही त्याचबरोबर ग्रामीण रुग्णालय चिंचवन या ठिकाणी रुग्णांना देखील जाण्यासाठी अडचण येत आहे. सदर मार्ग हा धारूर रस्त्यासाठी बायपास असून या ठिकाणी जर पूल केला तर ग्राहकांची मोठी सोय होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करून या ठिकाणी तत्काळ पूल उभारण्यात यावा अशी मागणी बाहेगव्हान आणि वडवणी शहरातील नागरिकांनी केले आहे. या बाबीकडे गंभीर दखल देऊन जिल्हाधिकारी बीड यांनी नागरिकांची गैरसोय टाळावी अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर शेकडो नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत



# आनंदगाव शिवारात वीज कोसळून वासराचा मृत्यू


प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील आनंदगाव शिवारात रविवार रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अवकाळी पाऊस झाला.विजेचा कडकडाट झाला.हरिभाऊ सोपान घोगले यांच्या शेतातबांधलेल्या गायीच्या वासराच्या अंगावर वीज कोसळल्याने वासराचा मृत्यू झाला.वासराचा मृत्यू झाल्याने पशु पालक हरिभाऊ घोगले यांचे नुकसान झाले आहे.याबाबत पंचनामा केला जाणारअसल्याची माहिती महसूल प्रशासनाने दिली आहे. शेतकऱ्याला तात्काळ मदत मिळावी अशी मागणी शेतकरी बांधवांनी केली आहे.

# माजलगावात सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन

## स्वागताध्यक्ष श्रीहरी नाना मोरे, सचिन डोंगरे यांची माहिती

प्रतिनिधी @ माजलगांव



राज्याच्या सामाजिक न्याय मंत्रीपदी तथा छत्रपती संभाजी नगरच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना. संजय सिरसट यांच्या नागरी सत्काराचे आयोजन माजलगाव येथे दि. २४ शनिवार रोजी बहुजन समाजाच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती स्वागताध्यक्ष तथा बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिन डोंगरे यांनी दिली आहे.

शहरातील जुना मोंढा येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास बहुजन नेते बाबुराव पोटभरे, आमदार धनंजय मुंडे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार विजयसिंह पंडित, आमदार नमिता मुंदडा, शिवसेनेच्या युवा नेत्या हर्षदा सिरसट यांची उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचे निमंत्रण ना. संजय शिरसट यांना देत उपसभापती श्रीहरी नाना मोरे, नवनाथ धाईजे, भीमराव टाकणखार यांनी त्यांचा सत्कार केला. याच कार्यक्रमात दुपारी चार वाजता गायनाचा कार्यक्रम पेढे तुला व नागरी सत्कार असा भव्य दिव्य कार्यक्रम होणार असून कार्यक्रमास उपस्थित रहा असे आवाहन राजेश साळवे, प्रशांत ससाने, शहराध्यक्ष राहुल मस्के, अशोक लांडगे, प्रदीप पट्टेकर, वसंत वाव्हळकर, बाबा शेख, फेरोज शेख, विजय धाईजे, विनोद शिंदे, अभिजीत पोटभरे, अक्षय मोरे, सदानंद प्रधान, बाबा वाघमारे, नितिन काळे, किरण खळगे, विजय साळवे, धर्मा मोरे, आकाश माने, दीपक टाकणखार, जयदीप तांगडे, विठ्ठल पंडित, लखन हजारे यांनी केले आहे.

# राज्य महामार्गाच्या कामासाठी वृक्षांची केली कत्तल,वटवृक्षाची कत्तल झाली त्याजागी रोपांची लागवड कधी होणार?

प्रतिनिधी @ केज

सध्या सर्वत्र महामार्गाचे काम धावत्या गतीने सुरू आहे.अंबाजोगाई केज बीड या मार्गे जाणाऱ्या महामार्गाचे काम करण्यासाठी महाकाय वटवृक्षाची कत्तल करण्यात आली. यावेळी वृक्षाच्या मनातील भावना म्हणजे मज जगवायचे राहून गेले अशी म्हणून त्या भल्यामोठ्या वटवृक्ष आणि आपले डोळे मिटले आहेत त्यांना पुनर्जीवित करता आले असते.रस्त्याच्या बाजूला पुनर्रोपण करता आले असते मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले.या बदल्यात रस्त्याच्यादुतर्फा रोपांची लागवड करण्यात येणार असा फतवाही निघाला मात्रप्रत्यक्षदर्शी अद्यापपर्यंत कोणतेही रोप लावले गेले नाही यामुळेच विकासाकडे जाणारे महामार्ग हे विनाशाकडे जातात की काय ?असा प्रश्न निसर्ग प्रेमींमध्ये निर्माण झाला आहे.वृक्षाचे पुनर्जीवन करावे व रस्त्याच्या दुतर्फा हा रस्त्याची लागवड



करावी अशी मागणी केली जात आहे

सध्या रस्त्याच्या बाजूला अनेक मोठ्या झाडांचे अवशेष पडलेले आहेत मुख्यत्वेकरून वटवृक्ष नामशेष झाले आहेत. त्याचे पुनर्जीवन करता आले असते परंतु याकडे मात्र कोणी लक्ष घातलेच नाही.मागील काही वर्षापूर्वी लातूर मध्ये वटवृक्षाचे पुनर्रोपण करण्याचा प्रयोग यशस्वी झाला होता.असाच उपक्रम केज जिल्हा अतिरिक्त सत्रन्यायालयात यशस्वी पणे विधीज्ञ मंडळी यांनी साध्य केला आहे. असाच उपक्रम करून अनेक वृक्षांचे संगोपन करता आले असते मात्र याचे कोणास देणेघेणे नाही सध्या सर्वत्र वृक्ष तोड खुलेआम चालू आहे वनीकरण विभाग दुरुनच पाहतो आहे. वृक्ष लागवड केवळ कागदावरच होते.शत कोटी वृक्ष लागवडीचा बोजवारा उडालेला सर्वश्रुत आहेच.या प्रकरणी वृक्ष मित्रांनी यासाठी मंत्रालयात मागणी केली मात्र याकडे कोणी लक्ष घातले नाही परिणामतः सर्व वृक्षांची कत्तल झाली आहे.सध्या रस्त्याच्या दुतर्फा या वृक्षांचे अवशेष पडलेले आहेत याकडे बघूननवी पालवी कधी फुटणार कधी उगवणार आणि पर्यावरणाचे संवर्धन कधी होणार असा प्रश्न उभा आहे.याची दखल घेऊन वृक्षलागवड तात्काळ व्हावी अशी मागणी केली जात आहे रस्त्याच्या कडेला असलेले भलेमोठे वृक्ष तोडण्यात आले आहेत झाडांच्या कत्तलीझाल्या त्याच्या बदल्यात झाडे लावण्याची जबाबदारी गुत्तेदार,प्रशासन की नेमकी कोणाची ? हा प्रश्न अनुत्तरित आहे

तोडलेल्या झाडांच्या बदल्यात नवीन चार रोपांची लागवड करून त्याचे संवर्धन करणे गरजेचे आहे.अन्यथा दळणवळणासाठी केलेला विकास हा माणसांना भकास करेल,या पावसाळ्यात तात्काळ रोपांची लागवड न झाल्यास अन्नत्याग सत्याग्रह करणार आहे. वृक्षमित्र डॉ.हनुमंत सौदागर केज.

# खा.बजरंग सोनवणेंची शिवराज दिवटे यांची रुग्णालयात घेतली भेट

## परळीतील गुंडगिरीवर कठोर कारवाईची केली मागणी

प्रतिनिधी @ केज



परळी तालुक्यातील अमानुष मारहाणीच्या घटनेत जखमी झालेला लिंबोटा येथील तरूण शिवराज दिवटे हा अंबाजोगाईतील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकिय रूग्णालयात उपचार घेत आहे. दि.१८ रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी त्याची रूग्णालयात जावून भेट घेत सर्व घटनाक्रम जाणून घेतला,शिवाय, घाबरू नको,मी सोबत आहे,असाही धीरही दिवटेला दिला.दरम्यान, गेल्या कांही वर्षात तयार झालेला परळी पॅटर्नचा बिमोड करण्या साठी विशेष आयपीएस अधिकारी नेमून येथील गुंडगीरी मोडीत काढावी अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली

दोन दिवसांपुर्वी परळी तील अमानूष मारहाणी चा व्हिडीओ समोर आला होता.यात शिवराज दिवटे यास मारहाण करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. दरम्यान,अंबाजोगाईच्यास्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय रुग्णालयात शिवराज दिवटे या तरूणावर उपचार सुरू आहेत.त्या ठिकाणी जावून त्याच्या तब्येतीची विचारपूस केली आणि त्याला मिळत असलेल्या उपचाराबाबत संबंधित डॉक्टर व रुग्णालयाचे अधिष्ठाता यांचेकडुन माहिती घेतली.दिवटे कुटूंबियांना धीर दिला. त्यानंतर केज–अंबाजोगाई रोडवर झालेल्या कंटेनर अपघातात जखमी झालेल्या रुग्णांचीही भेट घेतली.डॉक्टरांशी चर्चा करून सगळ्यांना योग्य ती वैद्यकीय मदत मिळतेय ना,याची खातरजमाकेली.यावेळी बोलताना खा.सोनवणे म्हणाले,परळी व परिसरात दहशतीचा धंदा निर्माणकरण्याकडे नवतरुणांचा कल वाढत आहे.ही अत्यंत गंभीर बाब आहे.हे थांबवायचे असेल तर कायद्याचे राज्य स्थापण होणे गरजेचे आहे.या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी एक स्वतंत्र आयपीएस अधिकारी नेमण्यात यावा,परळीतील सर्वच वादग्रस्त पोलिस अधिकारी यांच्या तातडीने बदल्या कराव्यात,शिवराज दिवटे प्रकरणातील सर्व आरोपींवर कठोरात कठोर शासन करावे, अशा मागणी राज्य सरकारकडे करत आहे. तर दिवटे परिवाराला पोलिस संरक्षण देण्यात यावे.त्यांनारूग्णालयातही धमकावण्याचे काम सुरू आहे.त्याकडे पोलीस प्रशासनाने गांभिर्याने पहावे अशी मागणी केली.राज्य सरकारकडे करण्यात आलेल्या मागण्या आज संध्याकाळपर्यन्त मान्य कराव्यात,अन्यथा बीड जिल्हा उद्या बंद करण्यासाठी जिल्हा बंदची हाक देण्यात येईल,असा इशाराही यावेळी खा.सोनवणे यांनी दिला.याच बरोबर बीड जिल्ह्यामध्ये जे चाललंय ते अत्यंतदुर्दैवी आहे.बीड जिल्ह्यात अनेक घटना घडतात की या गुन्ह्यांची पाळेमुळे परळीतील विशिष्ठ लोकांच्याकडे सापडतात.अतिशय वाईट कृत्य करणारे तरुण परळी शहरात आणि परिसरात तयार होत आहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे.स्व.संतोष देशमुख यांचे ज्या दिवशी अपहरण आणि खुन झाला त्या दिवसा पासून मी संसदेत व बाहेर आवाज उठवत आहे.सर्व आमदार आणि सामाजिक कार्यकर्ते बोलत आहेत मात्र या गुंड प्रवृत्तीला रोखण्यासाठीपोलिसांनी क्रियाशील पुढाकार घ्यायला हवा असेही खा.सोनवणे म्हणाले.

परळी पॅटर्नसाठी उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे आयपीएस लेव्हलचा एक विशेष अधिकारी नेमण्यात यावा अशी मागणी करणार आहे. परळी मध्ये १९९२ पासून सत्तेने मस्तावलेली प्रवृत्ती आहे.सत्तेचा राजाश्रय मिळत असल्याने हे लोक दादागिरी आणि गुंडगिरी करीत आहेत.

बोगस पिकविमा उचलण्यातही हेच लोक

बोगस पिकविम्याचे लाखो नव्हे तर करोडो रुपये काही धेंडानी उचलले आहेत.नांदेड, लातूर,परभणी अशा चारपाच जिल्ह्यात बोगस पीकविमा भरला आहे.याची सर्वांकडे ऑफलाईन पद्धतीने तक्रार केलेली आहेअसे सांगत मुख्यमंत्र्यांनी बीड जिल्ह्याच्या गृह खात्यावर आणि जेल प्रशासनावर बोलले पाहिजेत.बीडचे जेल प्रशासन हे जास्तच बोगस प्रशासन आहे, याचा उल्लेखही खा. सोनवणे यांनी केला.

# गुंडांचा माज उतरवणार, बोलणार कमी काम जास्त करणार – मनोज जरांगे पाटील

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



किती दिवस आम्ही तरी शांत रहायचे? ही वाढती गुंडगिरी रोखण्यासाठी मीच पुढाकार घेणार आहे, असं मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी म्हंटलं आहे. परळीतील शिवराज दिवटे याला अमानुषपणे मारहाण करण्यात आलेली आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. आज मनोज जरांगे यांनी स्वा.रा.ती. रुग्णालयात जाऊन शिवराज दिवटेची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली आहे. बीड जिल्ह्यात गुंडगिरीच्या माध्यमातून हल्ले होतच राहणार, आम्ही काय नुसतं भेटी देत फिरायचं? ही विदारक परिस्थिती दूर करण्यासाठी मी स्वत: पुढाकार घेईल असंही यावेळी जरांगे यांनी म्हंटलं आहे.

पुढे बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, सामूहिक कट रचून शिवराजला जीवे मारण्यासाठीच अपहरण करण्यात आलं होतं. मात्र लोक धावून आल्याने त्याचा जीव वाचला. त्याच्या अंगावरील मारहाणीचे वळ पाहून अंगावर काटा येतो. अशा घटना वारंवार घडूनही सरकार काहीच करत नाही. किती दिवस आम्ही तरी शांत रहायचं? बीड जिल्ह्यातील सर्व घराणे व सामाजिक क्षेत्रातील लोकांशी चर्चा करुन पुढचे पाऊल उचलण्याची वेळ आली आहे. गुंडांचा माज उतरवणार. यापुढे बोलणार कमी व काम जास्त करणार, असा सूचक इशाराच मनोज जरांगे यांनी दिला आहे.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड –४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

# अन्नप्रक्रिया उद्योगाचे हब म्हणून परभणीला विकसित करणार- पालकमंत्री मेघना बोर्डीकर

## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात 'खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन' उत्साहात संपन्न

परभणी -अन्नप्रक्रिया उद्योगाचे हब म्हणून परभणीला विकसित केले जाईल, यासाठी लागणारा कच्चा माल स्थानिक शेतकऱ्यांकडून घेतला जाईल, असे प्रतिपादन राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता, उर्जा, महिला व बालकल्याण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय आणि कृषि विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने खरीप खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शन आज विद्यापीठाच्या सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात उत्सहात संपन्न झाले.

खरीप पीक परिसंवाद व कृषि प्रदर्शनाचे उद्घाटन पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ.इन्द्र मणि हे होते. व्यासपीठावर महाराष्ट्र शासनाचे माजी कृषि आयुक्त उमाकांत दांगट, विद्यापीठ कार्यकारी परिषद सन्मानीय सदस्य दिलीप देशमुख, भागवत देवसरकर, विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, शिक्षण संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ.राकेश अहिरे, कुलसचिव संतोष वेणीकर, विभागीय कृषी संचालक प्रकाश देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दौलत चव्हाण, प्रगतशील शेतकरी दादा लाड, चंद्रकांत वरपूडकर, सुधीर अग्रवाल, महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता, विद्यार्थी कल्याण अधिकारी, मुख्य शिक्षण विस्तार अधिकारी आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विशेष पुढाकार घेत विद्यापीठाने ५०० शेतकऱ्यांना दत्तक घेतले आहे. त्यांची प्रगती साधण्यासाठी विज्ञानाधिष्ठित शेतीतंत्रज्ञानाचा उपयोग केला जाणार आहे. यासाठी विद्यापीठाच्या कुलगुरुंनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांचे मी अभिनंदन करते. परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पादन वाढावे, यासाठी त्यांना दत्तक घेऊन मार्गदर्शन करणे आवश्यक होते. विद्यापीठाने ही भूमिका स्वीकारल्याबद्दल मी विशेष आनंद व्यक्त करते. यावेळी त्यांनी प्रगतशील शेतकरी दादा लाड तसेच मथुरा येथील यशस्वी शेतकरी सुधीर अग्रवाल यांच्या कार्याचा गौरव केला. विद्यापीठाच्या मार्गदर्शनामुळे त्यांनी शेतीत उल्लेखनीय यश मिळवले आहे. महिलांचा शेती व्यवसायातील सहभाग आणि त्यांच्या कुटुंब उभारणीमधील महत्त्व अधोरेखित करत त्यांनी सांगितले की, हे वर्ष महिला शेतकऱ्यांना समर्पित असावे. परभणी शक्ती सारखी वाणे, आधुनिक तंत्रज्ञान महिलांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य व्हावे. नैसर्गिक आपत्तीवर मात करत अधिक उत्पादन घेण्यासाठी विद्यापीठाने विकसित केलेले तंत्रज्ञान उपयुक्त ठरत आहे. केंद्र शासनाची 'पी. एम. सन्मान योजना' आणि राज्य शासनाचे विविध उपक्रम हे शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी जिओमार्टसारख्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थांमध्ये यश संपादन केले आहे. हेच यश परभणी जिल्ह्यातही दिसावे, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. यासाठी त्यांनी परभणी जिल्ह्यात १०० लघु व मध्यम उद्योग उभारण्याचा संकल्प केला आहे. अन्नप्रक्रिया उद्योगाचे हब म्हणून परभणीला विकसित करायचे असून, यासाठी लागणारा कच्चा माल स्थानिक शेतकऱ्यांकडूनच घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी विद्यापीठ हे शेतकऱ्यांना 'शेतकरी देव भव:' मानून कार्य करत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, त्यांना नवतंत्रज्ञानाची जोड देणे आणि त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवणे हे विद्यापीठाचे ध्येय आहे, असे प्रतिपादन केले. परभणी येथे पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ५०० शेतकऱ्यांसोबत कार्य करण्याच्या उपक्रमाचे उद्घाटन यावेळी त्यांनी केले. या उपक्रमात शेतकऱ्यांना तांत्रिक मदत, प्रशिक्षण आणि संशोधनाधारित उपाययोजना पुरवण्यात येणार आहेत. तसेच त्यांनी जाहीर केले की, चालू वर्ष 'महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे करण्यात येणार आहे. महिलांच्या शेतीतील योगदानाची दखल घेत त्यांना आधुनिक साधने, तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण पुरवले जाणार आहे. परभणी शक्तीसारखी आधुनिक वाणे त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा मानस विद्यापीठाने व्यक्त केला आहे. विद्यापीठाने विविध कृषी संशोधनातून परभणीचे नाव देशभर पोहोचवले आहे. तीळ, करडई, थोर, सोयाबीन यांचे नवे वाण तयार करून त्याचे राष्ट्रीय पातळीवर प्रसारण करण्यात आले आहे. परभणी शक्ती या पोषण जैव संपृप्त वाणासह दोन बाजरीचे जैव-वाणही विकसित केले आहेत. सोयाबीनच्या बियाण्याच्या अडचणी सोडविल्याचे कौतुक जबलपूर येथील बियाणे संचालकांनी केले असून, परभणीत दीड कोटी रुपयांचे बियाणे हब सरकारमार्फत मंजूर झाले आहे. विद्यापीठाने विकसित केलेला तुरीचा गोदावरी वाण महाराष्ट्रासह इतर राज्यांतही लोकप्रिय असून, तो 'लखपती वाण' म्हणून ओळखला जात आहे. देशातील एकमेव ड्रोन पायलट प्रशिक्षण केंद्र परभणीत सुरू असून, अलीकडेच २६ विद्यार्थ्यांची पहिली बॅच यशस्वीरीत्या प्रशिक्षित झाली आहे. हे केंद्र कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याच्या दिशेने मोठे पाऊल आहे. विद्यापीठाने आतापर्यंत ६५ कोटी रुपयांचा बाह्य निधी मिळवून विविध संशोधन प्रकल्प उभारले आहेत. नवे शैक्षणिक धोरण अवलंबून शैक्षणिक गुणवत्ता व नाविन्यपूर्ण संशोधन वाढवले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर परिसंवाद आयोजित करून विद्यापीठाची विश्वासार्हता सिद्ध केली आहे.दर आठवड्याला दोन वेळेस ऑनलाइन 'शेतकरी-शास्त्रज्ञ संवाद' आयोजित करून शेतकऱ्यांच्या समस्यांवर त्वरित उपाय दिले जातात. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या बुधवारी विशेष संवाद सत्र घेतले जाते. अन्नसुरक्षेसाठी सक्षम शेतकरी आवश्यक आहेत. शेतीला आरोग्य, अभियांत्रिकी, शिक्षणासारखेच महत्त्व देऊनच आपण सशक्त राष्ट्र निर्माण करू शकतो, असे सांगत माननीय कुलगुरू यांनी विद्यापीठाच्या समर्पित कार्याचा आढावा दिला.

माजी कृषि आयुक्त उमाकांत दांगट यांनी नमूद केले की, या विद्यापीठाने मला योग्य संस्कार आणि जीवनमूल्य दिले. त्यामुळेच मी परभणीपासून महाराष्ट्रातील विविध पदांवर यशस्वीपणे कार्य करू शकलो. हे विद्यापीठ म्हणजे माझ्यासाठी तीर्थक्षेत्र आहे. मी येथे घडलो आणि धन्य झालो, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या कार्याची प्रशंसा करत शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाने घेतलेल्या पुढाकारांचे कौतुक केले.अन्नसुरक्षेच्या क्षेत्रात या विद्यापीठाचा मोलाचा वाटा आहे. मात्र, आता नव्या आव्हानांसाठी विद्यापीठ सज्ज राहणे आवश्यक आहे. हवामानातील बदल, जागतिक तापमानवाढ, उत्पादनातील वाढ असूनही बाजारभावाच्या समस्येसाठी प्रभावी विपणन व्यवस्था आणि मूल्यवर्धन साखळी निर्माण करण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. सध्या विद्यापीठात संख्यात्मक वाढ दिसून येते. मात्र, आता गुणवत्तेवर भर देण्याची वेळ आली आहे. त्यासाठी विद्यापीठातील रिक्त पदे तातडीने भरली गेली पाहिजेत, अशी विनंतीही त्यांनी यावेळी केली.माननीय कुलगुरूंच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ नव्या उंचीवर पोहोचत असल्याचे सांगत, संशोधन, शिक्षण, आणि विस्तार कार्य या तिन्ही अंगांनी

---

### अंगावर वीज पडून १९ वर्षीय शेतकरी युवकाचा मृत्यू

परभणी (प्रतिनिधी) : जिंतूर तालुक्यातील पिंपरी रोहिला शिवारात अंगावर वीज पडून भरत गंगाधरराव पिसाळ या १९ वर्षीय शेतकरी युवकाचा मृत्यू झाला. शनिवारी दुपारी ४.३० वाजेच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली.गेल्या चार दिवसांपासून जिल्ह्यातील वातावरण पूर्णतः बदलले आहे. विशेषतः तापमानात मोठ्या प्रमाणावर चढ-उतार होत आहे. गेल्या दोन दिवसांपूर्वीच जिल्ह्यात ठिकठिकाणी थोडा-अधिक पाऊस झाला. शनिवारी (दि.१७) चार ते साडेचार वाजेच्या सुमारास ढगाळ वातावरणा पाठोपाठ विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्याने व अवकाळी पावसाने अक्षरशः झोडपून काढले.याच दरम्यान जिंतूर तालुक्यातील पिंपरी रोहिला येथील शिवारात गट क्रमांक १७० या शेतामध्ये शनिवारी सायंकाळी ४.३० वाजेच्या शेतात काम करत असतांना अंगावर वीज पडून भरत पिसाळ या शेतकरी युवकाचा मृत्यू झाला. या घटनेने हळहळ व्यक्त होत आहे.




### पितृछत्र हरवलेल्या मुलीला विवाहासाठी दिले संसारोपयोगी साहित्य

एचएआरसी संस्थेचा उपक्रम

परभणी/प्रतिनिधी:

शहरातील विष्णू नगर येथे पुंगळा ता. जिंतूर येथील पितृछत्र हरवलेल्या निराधार मुलीला लोकसहभागातून संसारोपयोगी साहित्याची मदत करण्यासाठी 'रुखवत' सोहळ्याचे रविवार (दि. १८) रोजी आयोजन करण्यात आले.

पुंगळा येथील एका निराधार विधवा मुलीचा विवाह सोमवार (दि. २०)रोजी आयोजित केला आहे. काही वर्षापूर्वी या मुलीच्या पित्याचे निधन झाले. या निराधार ताईला सासू - सासरे व वडील, भाऊ नाही. ही निराधार ताई रोजमजुरी तिन्ही लेकरांचा उदरनिर्वाह करीत त्यांना शिकवत आहे. त्यापैकी मूल एक दिव्यांग आहे. रोज मजुरी करून उदरनिर्वाह करत असतानाच आता मुलीच्या लग्नाचा खर्च कसा करावा? या चिंतेने तिच्या आईला ग्रासले होते. तिची हलाखीची आर्थिक परिस्थिती पाहता एचएआरसी संस्थेकडे विवाह व संसारोपयोगी मदतीची मागणी केली केली होती. या एकल पालक व निराधार मुलीची आर्थिक परिस्थिती पाहता होमिओपॅथिक अकॅडमी ऑफ रिसर्च अँड चॅरिटीज या संस्थे तर्फे पालकत्व स्वीकारून लोकसहभागातून मदतीचे आवाहन केले होते.

### पिंपळगाव गोसावी येथे दोन गटांत हाणामारी

### परस्परविरूद्ध तक्रारीतून २२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल

चारठाणा/प्रतिनीधी:

पिंपळगाव गोसावी येथे कृषि विभागामार्फत बीज उगवण क्षमता तपासणी बाबत मार्गदर्शन करण्यासाठी बैठक सुरु असतांना दोन गटांत वादविवाद होऊन आपसांत हाणामारी झाल्याची घटना घडली असून या प्रकरणी परस्पर फिर्यादीवरून दोन्ही गटाच्या एकुण २२ जणांविरुद्ध चारठाणा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर घटना शुक्रवार )दि. १६) रोजी घडली.

यासंदर्भात नवनाथ ज्ञानदेव बुधवंत याने फिर्याद दिली असून पिंपळगाव येथील महादेव मंदीर परिसरात बीज उगवण क्षमताबाबत कृषी विभागाची मार्गदर्शन बैठक सुरु असतांना फिर्यादीने तुम्ही रजिस्टरवर सह्या कशाला घेता? अशी विचारणा केली असता डिगांबर बुधवंत, दत्ता बुधवंत, किसन बुधवंत, आशामती बुधवंत, सरपंच कुंताबाई डिगांबर बुधवंत, राणीबाई दत्तराव बुधवंत, मुगाजी दत्तराव बुधवंत, युवराज डिगांबर बुधवंत आदींनी शिवीगाळ करुन लाथाबुक्क्या व काठीने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. तर डिगांबर बुधवंत याने दिलेल्या फिर्यादीत आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवून कृषी विभागाच्या मार्गदर्शन बैठकीत शेतकर्यांच्या सह्या घेण्यासाठी हरकत घेऊन फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी नवनाथ बुधवंत, अंजेबा कुंडलिकराव बुधवंत, दिगांबर भगवान बुधवंत, बालासाहेब नारायण बुधवंत, वैजनाथ बुधवंत, मारोती बुधवंत, संतोष बुधवंत, शिवाजी बुधवंत, योगेश बुधवंत, अशोक बुधवंत, विष्णु बुधवंत, उषाबाई नवनाथ बुधवंत, सविता बुधवंत, वंदना बुधवंत आदी चौदा जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनिल अंधारे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक पोलिस उपनिरिक्षत दत्ता भदर्गे हे पुढील तपास करीत आहेत.

### चंदनझिरा येथे गांजा विक्री करणाऱ्या महिलेकडून ०४ किलो गांजा केला जप्त

प्रतिनिधी @ जालना

जालना जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे मा.पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव यांना सूचना दिल्या होत्या त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे व्यक्तीची माहिती काढून त्यांच्यावर कारवाई करण्याची सूचना देऊन मार्गदर्शन केले होते त्याअनुषंगाने दि.१६/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदाराकडून मानवी आरोग्यास घातक असलेला गांजा विक्रीची माहिती मिळाली की चंदनझिरा येथील लहुजीनगर झोपडपट्टी एकतानगर येथील महिला नामे पुजा ओमप्रकाश नाईक हि तिच्या राहत्या घरामध्ये मानवी आरोग्यास धोकादायक आणि हानिकारक असलेला गांजा ची अवैधरित्या स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी गांजा ची विक्री करत असल्याची माहिती गुप्त बातमीदारा मार्फत मिळाली असता मिळालेल्या बातमीच्या आधारे स्थानिक गुन्हे



जालना स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

शाखा जालना येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी चंदनझिरा येथील लहुजी नगर झोपडपट्टी एकतानगर येथे महिला नामे पुजा ओमप्रकाश नाईक हि राहत्या घरी छापा मारुन तिच्या घरामधून व ताब्यातून एकूण ०४ किलो ५७९ ग्रॅम वजनाचा गांजा रुपये ९१.५८० किंमती गांजा जप्त केला असून सदर माहिती विरुद्ध चंदनझिरा पोलीस ठाणे येथे एन.डी.पी.एस कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.सदरची कारवाई ही मा.पोलीस अधीक्षक श्री अजयकुमार बन्सल,मा.अपर पोलीस अधीक्षक श्री आयुष नोपाणी,मा.उपविभागीय पोलीस अधिकारी जालना श्री अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री पंकज जाधव पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जालना,सहा पोलीस निरीक्षक श्री योगेश उबाळे, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, रमेश राठोड, प्रभाकर वाघ, कैलास खार्डे, रुस्तुम जैवाळ, प्रशांत लोखंडे, इर्शाद पटेल, संदीप चिंचोले, रमेश काळे, भागवत खरात, धीरज भोसले, सचिन राऊत, गणेश वाघ, मपोअ/कविता काकस, सत्यभामा उबाळे सर्व स्थागुशा यांनी केली आहे.

---

### सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांना लुटण्याचा दरोडेखोरांचा प्रयत्न फसला

#### चौसाळा बायपास वरती गस्त वाढविण्याची मागणी

प्रतिनिधी @ बीड

बीड तालुक्यातील चौसाळा बायपासवरती सध्या लुटमारीच्या घटना मोठया प्रमाणावर वाढल्या असुन ट्रकचालकाना अडवुन त्यांच्याकडुन मुद्देमाल घेऊन हे दरोडेखोर पसार होत आहेत तसेच दुचाकीवरती एखादा ईसम दिसला तर त्याला गाडी आडवी लावुन मारहाण करुन त्याच्याकडील रक्कम व मोबाईल किंवा दागिने घेऊन हे चोरटे पसार होताना पाहावायास मिळत आहे असाच प्रकार सामाजिक चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते विवेक कुचेकर हे बायपास नजीक असलेल्या आपल्या शेतातुन रात्री ११-३० वाजता नांगरट करून बायपास वरून घरी येत असताना दुचाकी वरती तीन तरूण सुसाट वेगाने येत कुचेकर यांच्या दुचाकीला दुचाकी आडवी लावून व त्यांच्या जवळील धारधार शस्त्र गळयाला लावून काढ तुझ्याकडे पैसे किती आहेत असा दम दिला परतु पाठीमागुन येणारया स्वीफट डिजायर गाडीने ब्रेक मारताच हे दरोडेखोर दुचाकीवरती सूसाट वेगाने निघुन गेल्याची माहीती मिळत आहे चौसाळा बायपास वरती दुचाकी चालकाना लुटण्याचे प्रकार वाढले असुन याठिकाणी कायम स्वरुपी गस्त घालण्यासाठी पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलावीत असी मागणी सर्व सामान्य नागरिकांनी केली आहे.

बीड तालुक्यातील चौसाळा बायपासवरती सध्या लुटमारीच्या घटना मोठया प्रमाणावर वाढल्या असुन ट्रकचालकाना अडवुन त्यांच्याकडुन मुद्देमाल घेऊन हे दरोडेखोर पसार होत आहेत तसेच दुचाकीवरती एखादा ईसम दिसला तर त्याला गाडी आडवी लावुन मारहाण करुन त्याच्याकडील रक्कम व मोबाईल किंवा दागिने घेऊन हे चोरटे पसार होताना पाहावायास

### पाटोदा हायस्कूल बेलखंडी शाळेची यशाची परंपरा कायम

प्रतिनिधी @ बीड

बीड तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था बीड द्वारा संचलित पाटोदा हायस्कूल पाटोदा बे. ता. जि. बीड या शाळेने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातही यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या वर्षात शाळेचा एस एस सी बोर्ड परीक्षेचा निकाल ९८.८२ टक्के लागला आहे. शाळेतील यशस्वी विद्यार्थी येळवे ऋतुजा सुभाष ९३. ८० टक्के गुण घेऊन प्रथम, कु. माने रूपाली लक्ष्मण ९३% गुण घेऊन द्वितीय व कु. माने ऋतुजा भागवत ९२ . ६०%




गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळवलेला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर साहेब यांनी केले आहे व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी श्री राजूजी मचाले साहेब व सहाय्यक प्रशासक अधिकारी श्री योगेशजी पवार साहेब श्री एम ए राऊत सर कार्यालयीन अधिकारी व श्री प्रकाशजी राठोड कार्यालयीन अधीक्षक आणि शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री धनवंतजी मस्के साहेब व शाळेचे शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या सर्व यशवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच पाटोदा, बेलखंडी तसेच सर्व परिसरातील ग्रामस्थ व परिसरातील पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे खूप खूप अभिनंदन केले आहे.

# मराठवाड्याचा पाणी प्रश्न नक्की आहे तरी काय ?

## सिंचन अभ्यासक मराठवाडा पाणी प्रश्न नितीन पाटील खोडेगावकर यांचे विश्लेषण

प्रतिनिधी @ बीड

मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता होत असताना त्यानिमित्ताने दिनांक १६ सप्टेंबर रोजी राज्य मंत्रिमंडळाची बैठक मराठवाड्याची राजधानी असलेल्या औरंगाबाद येथे झाली जलविकास व व्यवस्थापन आणि पाण्याचे समन्यायी वाटप याबाबत मराठवाड्याचा पाणी प्रश्न नक्की आहे तरी काय ? याचा तपशील व तांत्रिक विश्लेषण पुढील प्रमाणे या लेखात आहे

-बांधकामाधीन प्रकल्प-

महाराष्ट्रातील गोदावरी नदीचा एकात्मिक जल विकास आराखडा जून २०१७ मध्ये तयार करण्यात आला या आराखड्यात मराठवाड्यातील बांधकामाधीन प्रकल्पांचा तपशील देण्यात आलेला आहे त्यानुसार मार्च २०१६ मध्ये मराठवाड्यात आठ मोठे,सहा मध्यम आणि चाळीस लघु असे एकूण ५४ राज्यस्तरीय सिंचन प्रकल्प बांधकामाधीन होते त्यांची एकूण अद्ययावत किंमत(मार्च २०१६अखेर) २१ हजार ७१७ कोटी रुपये, तर ते प्रकल्प पूर्ण करण्यासाठीची उर्वरित किंमत ११ हजार ८८ कोटी रुपये(एप्रिल २०१६) इतकी होती मोठे प्रकल्प सरासरी ३७ वर्ष, तर मध्यम प्रकल्प सरासरी २६ वर्ष रखडलेले आहेत( लघु प्रकल्पांचा तपशील देण्यात आलेला नाही.)

-जलनियोजनाची ऐशी-तैशी-

जायकवाडी प्रकल्प व त्याचे लाभक्षेत्र निम्न गोदावरी खोऱ्यात,तर पाणलोट क्षेत्र मात्र उर्ध्व गोदावरी खोऱ्यात आहे जायकवाडीच्या मूळ नियोजनातील गृहिते(सर्व आकडे टीएमसी मध्ये) पुढीलप्रमाणे आहेत

-उर्ध्व गोदावरी खोऱ्यात जायकवाडीपर्यंत पाण्याची उपलब्धता-१९६ टीएमसी आहे

यापैकी नाशिक आणि नगर जिल्ह्यातील धरणांकरीता ११५ टीएमसी पाणी आहे

- ७५ टक्के विश्वासार्हतेचा जायकवाडीचा येवा-९४.४- संकल्पित उपयुक्त साठा-७७,-निभावणीचा साठा-१३,-जायकवाडीतुन माजलगाव प्रकल्पात सोडायचे पाणी-१२.४,-पिण्याचे, घरगुती वापराचे आणि औद्योगिक वापराच्या पाण्याची तरतूद नाही

- जलाशयावरून उपसा सिंचनाची तरतूद नाही

- प्रवाही सिंचनासाठी पाणी-४९

पण कटू वास्तव वेगळे आहे उर्ध्व गोदावरी खोऱ्यात जायकवाडी पर्यंत पाण्याची उपलब्धता १९६ नव्हे,तर १५६ एवढीच आहे असे आता शासन म्हणते नाशिक आणि नगर भागात मूळ नियोजनापेक्षा जास्त क्षमतेची धरणे बांधली गेली त्या धरणांची प्रत्यक्ष साठवण क्षमता १५० टीएमसी म्हणजे ३५ टीएमसी अधिक आहे पण पाण्याचा प्रत्यक्ष वापर त्यापेक्षा जास्त



होतो कारण खरिपात धरणातील पाणी कालव्याद्वारे सर्वत्र बेकायदा फिरवले जाते त्यामुळे धरणातील पाणी पातळी कमी होते त्या भागात पाऊसमान चांगले असल्यामुळे धरणे परत भरतात या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे सर्वसामान्य पर्जन्यमानाच्या वर्षातदेखील आता जायकवाडी प्रत्यक्ष आवक आता २८.२२ टीएमसी म्हणजे ३० टक्के एवढीच येईल तात्पर्य हा प्रकार असाच चालू राहिला तर जायकवाडी यापुढे कधीही पुर्ण भरणार नाही अधिकारी म्हणतात

'विज्ञान आणि तंत्रज्ञानात बदल झाला. पण हे फक्त जायकवाडी बाबतीतच कसे घडले? जायकवाडीच्या समकालीन आणि इतर प्रकल्पांत का नाही झाले तसे ? उत्तर नाही ! ठीक आहे ४० टीएमसी तूट आहे हेही मान्य.पण, सगळी तूट जायकवाडी वरच टाकत ? जायकवाडी आणि तिच्या वरच्या सर्व प्रकल्पांमध्ये तुटीचे समन्यायी वाटप का नाही करत ?

-बिगर सिचंन-

फेरनियोजनात घरगुती आणि औद्योगिक मंजूर पाणी वापर अनुक्रमे ११८ व ७६ दलघमी दाखविण्यात आला आहे. मेंढेगिरी समितीच्या अहवालात मात्र मंजूर घरगुती वापर २८३ दलघमी आणि औद्योगिक वापर १६१ दलघमी दाखविला आहे औद्योगिक वापर १६१ दलघमी दाखविला आहे(संदर्भ पृष्ठ ११, गोदावरी अभ्यास गटाचा अहवाल,२०१३) समांतर पाणीपुरवठा योजना, स्मार्ट सिटी, डीएमआयसी आदीकरिता आरक्षित पाण्याबद्दल फेर नियोजन २०१८ मध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही

(१) सिंचन अनुशेष निर्मूलन सिंचन घोटाळ्यासंदर्भात दिनांक २९ नोव्हेंबर २०१२ रोजी प्रसिद्ध श्वेतपत्रिकेत शासनाने जाहीर करून टाकले आहे की गोदावरी खोऱ्याअंतर्गत मराठवाडा भागाकरिता(जी १ ते जी ५) नवीन प्रकल्पांसाठी पाणी उपलब्ध नाही आणि सन २००२- ०३ सन २०११-१२ या दहा वर्षात वैधानिक विकास मंडळावर राज्यात एकूण ४६,९६५ कोटींचा खर्च करण्यात आला त्यापैकी मराठवाड्यावर अंदाजे २० टक्के म्हणजे ९,४५३ कोटी रुपये खर्च झाले

(२) यातून मराठवाडा भौतिक अनुशेष १०० टक्के दूर झाला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २०१७-१८ च्या वार्षिक अहवालात मात्र अनुशेषासंदर्भात माहिती देताना नमूद करण्यात आले की निर्देशांक व अनुशेष समितीने १ एप्रिल १९९४ रोजीच्या राज्याच्या सिंचन क्षेत्रातील जिल्हा निहाय अनुशेष हा भौतिक अनुशेष(निर्मित सिचंन क्षमता) आणि आर्थिक अनुशेष( अनुषंगिक वित्तीय तरतूद) या आधारावर निर्धारित केला

(३) त्यावेळी आर्थिक अनुशेष ७४१८ कोटी होता त्यानंतर सन २००० मध्ये तो समायोजित करून ६६१८.३८ कोटी असा पुनपरिगणित करण्यात आला सन २००१ पासून राज्यपाल यांनी दिलेल्या निर्देशांचा परिणाम म्हणून मार्च २०११ पर्यंत राज्यातील सर्व जिल्ह्यातील आर्थिक अनुशेष दूर झाला तथापि चलनवाढ बांधकामाच्या कालावधीत झालेली वाढ आदी कारणांमुळे भौतिक अनुशेष दूर करण्यात अपेक्षेप्रमाणे यश आले नाही.

मूळ प्रकल्प अहवालानुसार मुकणे,वाकी,भाम व भावली या धरणांतील एकूण सर्व पाणी गोदावरी नदीद्वारे मधमेश्वर कालव्यावरील सिंचनासाठी वापरणे अभिप्रेत असताना नाशिक भागातील बिगर सिंचनासाठी प्रकल्पात एकूण ४२ टक्के आरक्षण करण्यात आले.-कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे २३.६६ टीएमसी पाणी त्वरित द्यावे. कृष्णा-मराठवाडा सिंचन योजना ही कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेवर अवलंबून आहे

-पण,आता कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेला कृष्णा पाणी तंटा निवाडा लवादाची अनुमती नसल्यामुळे कृष्णा-मराठवाडा सिचंन योजनेबद्दल शंका निर्माण झाली आहे.त्यामुळे कृष्णा-मराठवाडा सिचंन योजना आणि एकुनच कृष्णा खोऱ्यातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी याचा तातडीने पुनर्विचार होणे आवश्यक आहे अशाप्रकारे वरील तांत्रिक विश्लेषणात्मक मराठवाड्यातील जाणकार व जलतज्ञांचे देखील मत आहे.

### गेवराई: तय्यबनगरातील नागरिक पीटीआरपासून वंचित

## उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,अमरसिंह पंडित यांना मुस्लिमाचे वावडे का? सय्यद एजाज

प्रतिनिधी @ गेवराई

गेवराई शहरातील संजयनगर आणि साठेनगर येथील अतिक्रमणधारकांना माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १९ मे रोजी पीटीआर वाटपाचा कार्यक्रम होणार आहे. मात्र, मुस्लिम बहुल तय्यबनगर भागातील अतिक्रमणधारकांना या योजनेतून जाणीवपूर्वक वगळल्याचा गंभीर आरोप माजी नगरसेवक सय्यद एजाज यांनी केला आहे. त्यांनी माजी आ. पंडित आणि ना.अजित दादा पवार यांच्यावर कडाडून टीका करत मुस्लिम समाजासोबत दुजाभाव केल्याचा संतप्त सवाल उपस्थित केला.एजाज यांनी म्हटले की, माजी.आ अमरसिंह पंडित यांनी तय्यबनगरातील रहिवाशांना भावनिक करत पीटीआर मिळवून



देण्याचे आश्वासन दिले आणि कार्यकर्त्यांकडून फॉर्म भरवून घेतले. मात्र, आता हा भाग विसरला गेला. जर इनामी जागेचे पीटीआर होऊ शकत नसतील, तर खोटी आश्वासने देऊन जनतेला मुर्खात का काढले? तय्यबनगरातील सर्व मुस्लिम समाजाला जाणीवपूर्वक षडयंत्रातून वंचित ठेवले, असे एजाज यांनी ठणकावले. त्यांनी माजी.आ.अमरसिंह पंडित यांना मुस्लिमांचे वावडे संबोधत, मुस्लिमांच्या पाठीत खंजीर खुपसण्याची त्यांची जुनी कार्यपद्धती असल्याचा घणाघात केला.उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्यावरही एजाज यांनी निशाणा साधला. अजितदादांनी संजयनगर, साठेनगर येथे पीटीआर वाटप केले, पण तय्यबनगरातील गरिबांना का विसरले? हा मुस्लिम समाजासोबतचा भेदभाव आहे, अशी टीका त्यांनी केली. तय्यबनगरातील रहिवाशांमध्ये संतापाची लाट उसळली असून, लवकरच आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणी पंडित आणि पवार यांनी तातडीने पीटीआर का मिळाले नाही याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल,

## वंचित बहुजन आघाडी माजलगाव तालुका कार्यकारिणी जाहीर

### माजलगाव तालुका अध्यक्षपदी अशोक पौळ

प्रतिनिधी @ माजलगांव



रेखा ठाकुर प्रदेशाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी यांचे आदेशाने माजलगाव तालुका कार्य कारिणी जाहीर करण्यात आली आहे.या निवडीमध्ये माजलगाव तालुका अध्यक्ष अशोक उत्तमराव पौळ,रा.निपाणी टाकळी, संदीप महादेव फंदे (उपाध्यक्ष)रा.सावरगाव, भानुदास गिरमाजी साळवे,(उपाध्यक्ष) केसापुरी,रामेश्वर जोतिबा उदमले (उपाध्यक्ष) खानापूर,अनिल रामभाऊ साळवे (उपाध्यक्ष)भीमनगर, माजलगाव,समाधान अशोक गायकवाड(महासचिव)नाकलगाव,राम बप्पाजी देशमाने (संघटक)दिंद्रुड,सर्जेराव विलासराव शिंदे (सहसंघटक)राजेगाव,

प्रफुल्ल अशोक डोंगरे(सह संघटक) केसापुरी कॅम्प, किशोर खंडू कांबळे (सहसचिव)लवुळ क्र.१ या प्रमाणे जाहीर करण्यात आली आहे.सदरील कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे त्यांचे कडुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे पालन करून पक्ष वाढीस प्रयत्न करतील हिच अपेक्षा त्यांचेकडून करण्यात येत आहे.सदरच्या निवडीबद्दल अजय सरवदे वंचीत बहुजन आघाडी जिल्हाध्यक्ष, अंकुशराव जाधव (जि.सचिव),धमानंद साळवे(सलागार) सचीन उजगरे(उपाध्यक्ष),भारत तांगडे (जिल्हा उपाध्यक्ष)त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्या येत आहे.



बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष मा. अप्पर पोलीस अधीक्षक संजयजी पांडकर साहेब यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना मा.नगरसेवक सुहास पाटील, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे बीड जिल्हाध्यक्ष सुनील कुर्लेकर, विद्याधर खडकीकर महाराज, प्रसन्न खडकीकर इत्यादी



मुंबई - शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मुख्य प्रदोत, शिवसेना नेते मा. सुनिलजी प्रभु साहेब यांची भेट घेऊन जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी त्यांच्या जिल्हाप्रमुख पदाच्या दोन महिन्यांचा कार्य अहवाल सुपूर्द केला. यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव साहेब, नवनाथ प्रभाळे, सतिशसिह परदेशीं, अभिजित विप्र आदी.

## सिद्दिकी अजमुल उमर निसार अहमद'दहावी परीक्षेत यश

प्रतिनिधी @ परतुर

परतूर- येथिल डॉक्टर झाकेर हायस्कूल उर्दू मध्ये सिद्दिकी अजमुल उमर निसार अहमद याने दहावी बोर्ड परीक्षेत ८७.२० %गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. कठोर मेहनत आणि जिद्द या मुळेच आपल्याला हे यश मिळाले आहे असे त्याने सांगितले .या यशामध्ये माझे आईवडिल आणि गुरूजनांचा मोठा वाटा असल्याचे त्याने सांगितले. माझ्या शाळेतील शिक्षक आणि शिकवणी वर्गाचे शिक्षक व तसेच सर्व शिक्षकांनी वर्षभर सातत्याने मला मार्गदर्शन केले त्यांच्यामुळेच



मला अभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली ,असे त्याने सांगितले आहे डॉ झाकेर हायस्कूल चे मुख्याध्यापक,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सिद्दिकी अजमुल उमर निसार अहमद'यांचा कौतुक करून अभिनंदन केले आहे.

# ना.अजितदादांचे घड्याळ प्रा.ईश्वर मुंडे यांच्या हातात

प्रतिनिधी @ केज

बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षक ते शिक्षण विस्तार अधिकारी पदावर नौकरी करून खा.शरदचंद्र पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या प्रा.ईश्वर मुंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात धारूर तालुकाध्यक्ष,ओबसी सेल प्रदेश सरचिटणीस व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी सेल प्रदेशाध्यक्ष या पदांवर प्रभावीपणे कार्य केले.सन २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या विजयात प्रा.ईश्वर मुंडे यांचा मोलाचा वाटा होता.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या फुटीनंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी खा.शरदचंद्र पवार यांच्यासोबत राहणे पसंद केले. खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील साहेब यांच्या संम्मतीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ लढविण्यासाठी बीड जिल्ह्यात जन संपर्क वाढवला होता परंतू शेवटच्या टप्प्यात खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना माघार घ्यावी लागली होती.या वेळी प्रा.ईश्वर मुंडे यांनी समाजाचा रोष पत्करून पक्षाचे उमेदवार खा.बजरंग बप्पा सोनवणे यांचा प्रचार केला होता.नंतर प्रा.ईश्वर मुंडे यांनी विधानसभा निवडणुक २०२४ साठी माजलगाव मतदारसंघाचा निवडणुक पुर्व जन संपर्क दौरा पूर्ण केला होता. या वेळेला ही श्री मोहनराव जगताप यांचा पक्षात प्रवेश झाल्याने प्रा.ईश्वर मुंडे यांना संधी मिळाली नाही.

या नाराजीने प्रा.ईश्वर मुंडे यांनी माजलगाव विधानसभेची निवडणूक अपक्ष लढवून रंगत आनली होती परंतू शेवटच्या टप्प्यात आ.जयंतराव पाटील यांच्या विनंतीवरून खा.सुप्रीयाताई सुळे यांच्या माजलगाव येथील जाहीर प्रचार सभेत पक्षाचे उमेदवार श्री.मोहनराव जगताप यांना पाठींबा देवून त्यांच्या विजयासाठी प्रयत्न केले होते.

आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजलगाव मतदारसंघ व बीड जिल्ह्यात प्रमाणीक पणे केलेले काम खा.शरदचंद्र पवार साहेब व आ.जयंतराव पाटील साहेब यांना वास्तव सांगणारे मोठया मनाचे नेतृत्व बीड जिल्ह्यात नसल्यामुळे व पक्ष संघटनेपेक्षा स्वत:ची मानसे निर्माण करण्याचे राजकारण बीड जिल्ह्यात सुरू असल्यामुळे आपण



खा.शरदचंद्र पवार साहेब यांना सोडून जड अंत:करणाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर आबा चव्हाण यांच्या विनंतीवरून श्री रमेशराव आडसकर यांच्यासोबत वानखडे स्टेडियम, मुंबई येथे ना.अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात ना.अजितदादा पवार,खा.सुनीलराव तटकरे यांच्या हस्ते पक्षात प्रवेश केला असल्याचे प्रा.ईश्वर मुंडे यांनी केज येथील पक्ष नोंदणी कार्यक्रमात आपल्या भाषणात सांगितले.

पुढे बोलताना प्रा.ईश्वर मुंडे म्हणाले की,रमेशराव आडसकर हे कार्यकर्त्यांना पद व प्रतिष्ठा मिळवून देणारे नेते आहेत या मुळे आपण त्यांच्या नेतृत्वाखालील पक्ष वाढीचे काम करून सर्व नव्या जुन्यांना सोबत घेऊन जन हिताची कामे करत राहणार आहोत.या वेळी स्टेजवर श्री रमेशराव आडसकर,ड.राजेश्वर आबा चव्हाण,श्री.अंकुशराव इंगळे,श्री.दिलीपराव गुळभिले,श्री.ऋषिकेश आडसकर, श्री.राजाभाऊ औताडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.